१८७२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ५२२

REFBK-0006281

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. नं.

चरित्र. ८८२
२५०७९

# राधाकृष्णन्

## चरित्र व तत्त्वज्ञान

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
नं. ८८२.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६२८९

लेखक

श्री. दामोदर नरहर शिखरे.

एम्. ए.

संपादक "अग्रणी"

REFBK-0006281

— किंमत ८ आणे —

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | पाश्चात्यांना भेटलेला मांत्रिक | १–११ |
| २ | विद्यापीठांतील विक्रम | १२–१८ |
| ३ | पाश्चात्यांना पौरस्त्य धर्माची शिकवण | १९–२४ |
| ४ | अमेरिकेंतील यशःश्री | २५–३२ |
| ५ | मार्गदर्शक मतसंपदा | ३३–५० |
| ६ | हिंदु–धर्माचा गंगा–प्रवाह | ५१–६२ |
| ७ | प्रमुख ग्रंथांचा परिचय | ६३–६८ |

—

मुद्रक व प्रकाशक— श्री. दामोदर नरहर शिखरे;
'अग्रणी मुद्रणालय', ६२३।२६ सदाशिव पेठ, पुणें २.

४७८
२५/५/७२

# प्रस्ताव

सुमारें बारा वर्षांपूर्वी मीं 'सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. मध्यंतरींच्या काळांत हिंदुत्वासंबंधीं इतके ग्रंथ प्रकाशित झाले, इतके प्रश्न पुढें आले आणि मुख्यतः बॅ. सावरकरांच्या विद्युत्संचारामुळें इतकीं आंदोलनें निर्माण झालीं कीं, त्या सर्वासंबंधींचीं आपलीं मतें पुनश्च एकवार, अवश्य तेथें सुधारून, कागदावर उतरावींत असें मला वाटूं लागलें. तसें करतांना ज्यांच्या मत-प्रणालीचा मला अधिकांत अधिक उपयोग करावा लागला असता, ते म्हणजे जगद्विख्यात तत्त्वज्ञ प्रा. राधाकृष्णन्. नव्या–जुन्यांचा विवेक समतोलपणें करणारा दुसरा पंडित सांपडणें कठीण.

मँचेस्टर कॉलेजचे प्रिं. जॅक्स यांचे

He has in him the best of East and West

हे प्रशंसोद्गार अर्थवादाचे खास नव्हत. स्वामी विवेकानंदानंतर हिंदुधर्माची पताका खांद्यावर घेऊन जगाची वारी करणारे राधाकृष्णन् हेच एकटे आहेत. हिंदुस्थानाची कीर्ति दिगंत पसरविणारे या शतकांतील तीन

## प्रस्ताव

महापुरुष म्हणजे म. गांधी, डॉ. टागोर व प्रा. राधाकृष्णन्. भारताचा आत्मा, हृदय व मेंदू म्हणून ही त्रिमूर्ति जगताला माहीत आहे. हिंदुस्थानाची मनोदेवता जसे गांधीजी, त्याच्या संस्कृतीचें प्रतीक जसे टागोर; तसे त्याच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप म्हणजे राधाकृष्णन्.

लंडन 'टाइम्स'नें तर कांहीं बाबतींत राधाकृष्णन् यांना गांधीजींच्याहि वरचें स्थान दिलें आहे. गांधीजींच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त राधाकृष्णन् यांनीं जगांतील प्रमुख व्यक्तींची पुष्पांजलि एकत्र आणून जो ग्रंथ रचला, त्यावर आपल्या 'साहित्यपुरवणींत' अभिप्राय देतांना 'टाईम्स' नें अशी तुलना केली होती कीं,

> "राधाकृष्णन्सारख्या माणसाची निष्ठा जडवून घेणें हा गांधींचा एक मोठा विजयच मानला पाहिजे. कारण राजकारणाच्या रामरगड्याचा अनुभव राधाकृष्णन् यांना कमी असला, तरी बौद्धिक प्रकर्षांत व कदाचित् आत्मिक शुचितेंतहि ते खुद्द गांधींपेक्षां श्रेष्ठतर आहेत."

हा तरतमभाव सर्वांनाच योग्य वाटण्यासारखा नसला, तरी राधाकृष्णन् यांची योग्यता मात्र त्यानें निखालस सिद्ध होते. 'हिंदवासियांना मज्जाव' अशा पाट्या जगांत जेथें तेथें लागलेल्या असतांना कैक दरवाजांना धक्के देऊन ते उघडण्याचें श्रेय राधाकृष्णन् यांना आहे. अप्टन् व्याख्यानमाला घ्या किंवा हिबर्ट व्याख्यानमाला घ्या, ऑक्सफर्ड विद्यापीठाचें स्पाल्डिंग प्राध्यापकपद घ्या किंवा 'ऑल् सोल्स् अँड फेलोशिप् ऑफ दि ब्रिटिश अकॅडेमी', या संस्थेचें सभासदत्त्व घ्या—या सर्व 'बंदिस्त' स्थानीं प्रथम प्रवेश करण्याचें भाग्य राधाकृष्णन् यांना लाभलें आहे. त्यांच्या प्रखर बुद्धि-

मत्तेमुळें तेथलीं कुलुपें जणु वितळूनच गेलीं ! आणि त्यांचा सन्मान म्हणजे त्यांच्या मातृभूमीचा बहुमानच नव्हे काय !

मातृभूमीच्या अशा सुपुत्राचें चरित्र असें फारसें प्रसिद्ध नाहीं—मराठींत तर अगदींच नाहीं. तेव्हां गेल्या वर्षी मीं त्यांची पुण्यास भेट घेतली. त्या भेटींत त्यांची स्वतःविषयीं कांहीं बोलण्याची अनुत्सुकताच दिसली. अनुत्सेक हा त्यांच्या बौद्धिक विक्रमाचा अलंकारच आहे. गुहेंत बसलेल्या मुनिप्रमाणें शांत चित्तानें जगातील सर्व घडामोडींकडे ते लक्ष पुरवीत आहेत; आणि संधि येईल तेव्हां आपली मार्गदर्शक मतसंपदा जगाला मुक्तहस्तानें देत आहेत. स्वदेशाच्या उद्धाराचा प्रश्न तत्त्वचिंतानुवादांतहि ते विसरत नाहींत हें विशेष. १९२७ सालापासून आंध्र, म्हैसूर, लखनौ, नागपूर, अलाहाबाद वगैरे विद्यापीठांच्या पदवीदानप्रसंगीं त्यांनीं स्नातकांना उद्देशून जीं भाषणें केलीं, त्यांत भारतमातेची हाक तरुणांच्या कानांवर त्यांनीं घातलेली आहे, किंबहुना सुख—विलास टाकून शेतकऱ्या—कामकऱ्यांच्या कल्याणासाठीं झटण्याचाहि आदेश दिलेला आहे.

स्वदेश व स्वधर्म, पौरस्त्य व पाश्चात्य, तत्त्वज्ञान व क्रिया या द्वंद्वांचा मेळ घालणारे राधाकृष्णन् हे " आधुनिक मनांतील शंकाकिंतु निवारून आशा व धैर्य यांनीं श्रोत्यांचीं अंतःकरणें भारून टाकतात " असें जें वर्णन लंडन विद्यापीठाच्या कुलगुरूनें केलें, तें ध्यानीं घेऊन तरी आमच्या उदयोन्मुख पिढीनें राधाकृष्णन् यांच्या कर्मयोगी तत्त्वज्ञानाचा लाभ करून घ्यावा. तसें त्यांना करतां यावें म्हणून त्यांच्या चरित्र—ग्रंथाला त्यांच्या तत्त्व—विचारांची जोड देण्याचा हेतु मीं मनांत धरला. परंतु महायुद्धाच्या

## प्रस्ताव

महापुरुष म्हणजे म. गांधी, डॉ. टागोर व प्रा. राधाकृष्णन्. भारताचा आत्मा, हृदय व मेंदू म्हणून ही त्रिमूर्ति जगताला माहीत आहे. हिंदुस्थानाची मनोदेवता जसे गांधीजी, त्याच्या संस्कृतीचें प्रतीक जसे टागोर; तसे त्याच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप म्हणजे राधाकृष्णन्.

लंडन 'टाइम्स'नें तर कांहीं बाबतींत राधाकृष्णन् यांना गांधीजींच्याहि वरचें स्थान दिलें आहे. गांधीजींच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त राधाकृष्णन् यांनीं जगांतील प्रमुख व्यक्तींची पुष्पांजलि एकत्र आणून जो ग्रंथ रचला, त्यावर आपल्या 'साहित्यपुरवणींत' अभिप्राय देतांना 'टाईम्स' नें अशी तुलना केली होती कीं,

"राधाकृष्णन्सारख्या माणसाची निष्ठा जडवून घेणें हा गांधींचा एक मोठा विजयच मानला पाहिजे. कारण राजकारणाच्या रामरगाड्याचा अनुभव राधाकृष्णन् यांना कमी असला, तरी बौद्धिक प्रकर्षांत व कदाचित् आत्मिक शुचितेंतहि ते खुद्द गांधींपेक्षां श्रेष्ठतर आहेत."

हा तरतमभाव सर्वांनाच योग्य वाटण्यासारखा नसला, तरी राधाकृष्णन् यांची योग्यता मात्र त्यानें निखालस सिद्ध होतें. 'हिंदवासियांना मज्जाव' अशा पाट्या जगांत जेथें तेथें लागलेल्या असतांना कैक दरवाजांना धक्के देऊन ते उघडण्याचें श्रेय राधाकृष्णन् यांना आहे. अप्टन् व्याख्यानमाला घ्या किंवा हिबर्ट व्याख्यानमाला घ्या, ऑक्सफर्ड विद्यापीठाचें स्पाल्डिंग प्राध्यापकपद घ्या किंवा 'ऑल् सोल्स् अँड फेलोशिप् ऑफ दि ब्रिटिश अकॅडेमी', या संस्थेचें सभासदत्त्व घ्या—या सर्व 'बंदिस्त' स्थानीं प्रथम प्रवेश करण्याचें भाग्य राधाकृष्णन् यांना लाभलें आहे. त्यांच्या प्रखर बुद्धि-

सत्तेमुळें तेथलीं कुलुपें जणु वितळूनच गेलीं ! आणि त्यांचा सन्मान म्हणजे त्यांच्या मातृभूमीचा बहुमानच नव्हे काय !

मातृभूमीच्या अशा सुपुत्राचें चरित्र असें फारसें प्रसिद्ध नाहीं—मराठींत तर अगदींच नाहीं. तेव्हां गेल्या वर्षी मीं त्यांची पुण्याव भेट भेतली. त्या भेटींत त्यांची स्वतःविषयीं कांहीं बोलण्याची अनुत्सुकताच दिसली. अनुत्सेक हा त्यांच्या बौद्धिक विक्रमाचा अलंकारच आहे. गुहेंत बसलेल्या मुनिप्रमाणें शांत चित्तानें जगातील सर्व घडामोडींकडे ते लक्ष पुरवीत आहेत; आणि संधि येईल तेव्हां आपली मार्गदर्शक मतसंपदा जगाला मुक्तहस्तानें देत आहेत. स्वदेशाच्या उद्धाराचा प्रश्न तत्त्वचिंतानुवादांतहि ते विसरत नाहींत हें विशेष. १९२७ सालापासून आंध्र, म्हैसूर, लखनौ, नागपूर, अलाहाबाद वगैरे विद्यापीठांच्या पदवदानप्रसंगीं त्यांनीं स्नातकांना उद्देशून जीं भाषणें केलीं, त्यांत भारतमातेची हाक तरुणांच्या कानांवर त्यांनीं घातलेली आहे, किंबहुना सुख—विलास टाकून शेतकऱ्या—कामकऱ्यांच्या कल्याणासाठीं झटण्याचाहि आदेश दिलेला आहे.

स्वदेश व स्वधर्म, पौरस्त्य व पाश्चात्य, तत्त्वज्ञान व क्रिया या द्वंद्वांचा मेळ घालणारे राधाकृष्णन् हे “ आधुनिक मनांतील शंकाकिंतु निवारून आशा व धैर्य यांनीं श्रोत्यांचीं अंतःकरणें भारून टाकतात ” असें जें वर्णन लंडन विद्यापीठाच्या कुलगुरूनें केलें, तें ध्यानीं घेऊन तरी आमच्या उदयोन्मुख पिढीनें राधाकृष्णन् यांच्या कर्मयोगी तत्त्वज्ञानाचा लाभ करून घ्यावा. तसें त्यांना करतां यावें म्हणून त्यांच्या चरित्र—ग्रंथाला त्यांच्या तत्त्व—विचारांची जोड देण्याचा हेतु मीं मनांत धरला. परंतु महायुद्धाच्या

## प्रस्ताव

महागाईमुळें कागदाचे भाव चार–सहा पटींनीं वाढले व त्यामुळें या पुस्तकाचें स्वरूप तितक्या पटींनीं कमी झालें. म्हणून ‘ नवा हिंदुधर्म ’ या विस्तृत ग्रंथाची आशा मनांत बाळगून आतां हें लहानसर पुस्तकच तरुण वाचकांच्या हातीं देतों.

रथसप्तमी शके १८६३
२३ जानेवारी १९४२

दामोदर नरहर शिंखरे.

( १ )

# पाश्चात्यांना भेटलेला मांत्रिक

"No one is better equipped than Professer Radhakrishanan to interpret to the West that new and purified Hinduism of which he is probably the most distinguished representative "

—*Dr. Sydney Cave*

अवघा अर्धा तास व्याख्यान; पण तें सबंध जन्मभर लक्ष्यांत रहाण्यासारखें. पाश्चात्य विद्वानांना पौरस्त्य तत्त्वज्ञानाच्या दर्शनानें चकित करणारे श्री. **सर्वपल्ली राधाकृष्णन्** यांचें व्याख्यान पुणें येथें १९३४ सालीं वसंतव्याख्यानमालेतर्फे टिळकमंदिरांत होतें.

नव्हमींच्या दसपट श्रोतृवृंद उपस्थित होता; तरी श्वासोच्छ्वास ऐकूं यावा इतकी गाढ शांतता व्याख्यान संपेपर्यंत टिकून राहिली. साऱ्या जगाला ग्रासून टाकणारे दुःखद प्रश्न त्या छोट्याशा आवारांत आपल्या सोडवणुकीसाठीं व्याख्यात्यांच्या मुखाकडे पहात उभे होते.

★

उंच व सडसडीत शरीरयष्टि, गंभीर पण पाणीदार मुद्रा, तीक्ष्ण व चमकदार डोळे, डोक्याला आंतील विचाराप्रमाणेंच चापूनचोपून बसविलेलें पांढरेंशुभ्र मद्रासी पागोटें, अंगांत गुडघ्यापर्यंत स्वच्छ अंगरखा व तसेंच धवल धोतर यामुळें दुरून फाटकापासून पहाणाराला हिमालयाचेंच एकादें शुभ्र शिखर तेथें अवतीर्ण झाल्याचा भास होई. हिमालयांतून शांतपणें सतत स्रवत असणाऱ्या गंगानदीप्रमाणें श्री. राधाकृष्णन् यांच्या मृदु व घोटीव स्वरामधून शब्दांमागून शब्द व वाक्यामागून वाक्यें झुळझुळ अखंड वहात होतीं.

★

ऐकणारांची सहज एकतानता व्हावी अशी त्यांची प्रशांत व्याख्यानशैली होती. जणुं कांहीं त्यांना कांहींच श्रम पडत नाहींत, सहज बोलणें चाललेलें आहे असाच भास होत होता. तोंडाचा भाता धापा टाकीत नव्हता, आडवेतिडवे हातवारे हवा कापीत नव्हते किंवा विंचू चावल्याप्रमाणें शरीराची धांवपळ अथवा स्वराचा उंचनीचपणा—वक्तृत्वाचा हा फौजफाटा तेथें अणुमात्रहि नव्हता; तरी श्री. राधाकृष्णन् यांनीं श्रोतृगणाचीं मनें पुरीं जिंकलीं.

★

त्यांच्या व्याख्यानांत पं. जवाहरलालांचें इंग्रजी भाषेवरील अलौकिक प्रभुत्त्व असून त्याला अस्खलितपणाची जोड मिळालेली होती. डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्याप्रमाणें वाक्प्रवाह अस्खलित असून त्यांत उच्च विचारांची गंगा संगम पावलेली होती. श्री. कृष्णमूर्तिप्रमाणें आध्यात्मिक विचारांचा कैलास श्री. राधाकृष्णन् दाखवीत पण तो बुद्धीला, चिकित्सेला आवाहन करून. ना. शास्त्री यांच्याप्रमाणें स्वतः अगदीं स्थिर-शांत राहून आपल्या वक्तृत्त्वाच्या सुवासित वायुलहरी दशदिशा पसरविण्यांत श्री. राधाकृष्णन् यांचा हातखंडा असून त्यांच्या भाषणांत मृदुता व मंजुलता असल्यानें वायुलहरीच्या पायांत पैंजण घातल्यासारखेंच वाटे. क्वचित् कोठें बुद्धिगम्य विनोद, क्वचित् कोठें विरोधाभासात्मक सुभाषितें, क्वचित् कोठें उपनिषदांतील उपमा—या गुणसंपदेमुळें श्री. राधाकृष्णन् यांचें सर्व व्याख्यान जीवंत, वेधक, रमणीय व संस्मरणीय झालें—श्रोतृवर्गाचें चित्त पळभरहि विचलित न होतां व्याख्यानाशीं पूर्णपणें समरस झालें.

★

वक्तृत्त्वाचें एवढेंच वैभव श्री. राधाकृष्णन् यांच्या ठायीं असतें; तर त्यांचें व्याख्यान म्हणजे एक सुंदर, घोटीव, संगमरवरी पुतळा ठरलें असतें. पण त्यांच्या भाषणाच्या कणाकणांत विचारांचा जीवंतपणा नाचत असतो. ते त्यांचे विचार मृत असते; तर त्यांच्या कीर्तिमंदिराला ताजमहालपेक्षां अधिक महत्त्व आलें नसतें. पण आज ताजपेक्षांहि अधिक प्रभाव त्यांनीं पाश्चात्य जगतावर पाडून तें गुणलुब्ध व मंत्रमुग्ध करून सोडलें आहे.

★

पाश्चात्य विचार, भौतिक शास्त्रें, नवीन कल्पना यांची लस जशी ते हिंदुस्थानांतील आपल्या धर्मबांधवांना टोच-
विचारांची देवघेव तात; तशीच भारतीय तत्त्वज्ञान, आर्यांचा अध्यात्मविचार आणि येथील प्राचीन परंपरा यांची जडीबुट्टी ते युरोप-अमेरिकेंतील जडवादी लोकांच्या हातीं देतात. हिंदुस्थानांतील जीर्ण रूढि व भ्रष्ट धर्म यांवर ते जितके कठोर प्रहार करतात; तितकेच तीक्ष्ण आघात पाश्चात्यांच्या भोगात्मक व निरीश्वर संस्कृतीवर ते करतात. पूर्वेकडील जुन्या धर्मकल्पनांना त्यांनीं नवें तेज आणलें आणि पश्चिमेकडील नव्या सुधारणांना जुन्या तत्त्वांचें अधिष्ठान मिळवून दिलें. त्यांचें अंतःकरण भूतकालांत रमत असलें तरी मस्तक भविष्यकाळांत संचार करते. ' पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम, दोघींची गांठभेट अशक्य ' ही किप्लिंगची दर्पोक्ति त्यांनीं धुळीस मिळविली. हिंदुधर्माची भाषा पाश्चात्यांना समजावून सांगणारे ते नुसते दुभाषे नाहींत; भारतीय तत्त्वज्ञानाच्या गौरीशिखराची वाट दाखविणारे ते केवळ वाटाडे नाहींत; तर पूर्वेकडील तत्त्वज्ञानाची गंगा पश्चिम समुद्राला पोंचविणारे ते भगिरथ होत.

भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख पाश्चात्य जगाला नव्या परिभाषेंत करून देण्याचें कार्य स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ इत्यादि महाभागांनीं गेल्या शतकांतच सुरु केलेलें आहे. तें जितकें जास्त होईल तितकें इष्ट आहे—पाश्चात्य व पौरस्त्य या दोघांच्याहि दृष्टीनें. एकादा गटे, एकादा शोपेनहोर, एकादा मॅक्समुल्लर, हिंदु तत्त्व-ज्ञानाचें एक एक पुष्प हातीं लागतांच स्वर्गसुख हस्तगत झाल्या-प्रमाणें आनंदानें नाचूं लागतो हें खरें; पण पाश्चात्य बहुजनसमाजाच्या

डोळ्यावर संपन्नता व जेतृत्त्व यांचीं झांपडेंच लावलेलीं आहेत. त्यांची दृष्टि अंतर्मुख करण्याचें कार्य जगाच्या प्रगतीसाठीं अवश्य आहे.

**'देणें ईश्वराचें'**

१९१३ सालीं डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना ज्या 'गीतांजलि'नें नोबेल पारितोषिक मिळवून दिलें; तिचें महत्त्व याच दृष्टीनें विशेष आहे. नाहीं तर तुकारामाच्या अभंगापुढें गीतांजलि काय होय? गरुडापुढें चिमणी किंवा कामधेनुपुढें हरिणी. पण भौतिक शास्त्रांच्या कोंडमाऱ्यामुळें कासावीस झालेल्या पाश्चात्य जनतेला सूर्याऐवजीं काजवे किंवा समुद्राऐवजीं कालवे दिसले; तरी तोहि महालाभच वाटणें साहजिक आहे. म्हणूनच डॉ. टागोरांना नोबेल पारितोषिक देणाऱ्या समितीनें त्यांच्या कार्याचें वैशिष्ट्य पुढील शब्दांनीं वर्णिलें आहे.

"आपल्या काव्यांतील विचार-संपदा पाश्चात्य समाजाला इंग्रजी भाषेंतून मोठ्या कौशल्यानें पोंचविल्याबद्दल डॉ. टागोरांना नोबेल पारितोषिक देण्यांत येत आहे."

तसेंच व त्याचसाठीं डॉ. राधाकृष्णन् यांचा इंग्लंड व अमेरिका येथें अपूर्व असा बहुमान करण्यांत आला. पौर्वात्य व पाश्चात्य हीं उभय तत्त्वज्ञानें तळहातावरील आवळ्याप्रमाणें खेळविण्याइतकी ग्राहक व संग्राहक बुद्धि श्री. राधाकृष्णन् यांना लाभलेली आहे. असा असामान्य 'बुद्धिसंयोग' हा 'पौर्वदेहिक'च म्हटला पाहिजे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना 'बाळपणींच सर्वज्ञता' लाभली ती 'ईश्वराचें देणेंच' नव्हे काय? सर रमेशचंद्र दत्त यांनीं अठरावे वर्षीं आय्. सी. एस्च्या परीक्षेंत इंग्रजांवर मात करण्याइतकें इंग्रजीचें

ज्ञान प्रगट केलें. मद्रासकडील एक विद्या-विन्मुख कारकून श्री. रामानुजम् हे तिसाव्या वर्षाचे आंत गणितशास्त्रांत बुद्धीचा चमत्कार करून गेले. त्याच मद्रासप्रांतानें साऱ्या जगाची नजर दिपवून टाकणारें उंची रत्न ता. ५ सप्टेंबर १८८८ मध्यें पृथ्वीतलावर आणलें; आणि पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध, धर्मज्ञान व विज्ञान, अध्यात्मवाद व जडवाद या दोहोंचेंहि परम कल्याण साधलें.

**पारतंत्र्यानें जर्जर झालेला मायदेश**

लॉर्ड मेकॉलेपासून मिस् मेयोपर्यंत किती तरी गोरे लेखक परतंत्र हिंदुस्थानचें निंदा-पुराण गात आले आहेत. " पिंजऱ्यामाजीं व्याघ्र सांपडे, बायकापोरें मारती खडे " अशी दुर्दशा कोणत्याहि परतंत्र राष्ट्राला अनुभवावी लागतेच. त्याचा धर्म रानटी, त्याची संस्कृति बुरसलेली, त्यांतील समाज लाकूडफोडे व पाणीकाढे होण्याच्याच योग्यतेचा—विद्या नाहीं, शोध नाहीं, धडाडी नाहीं, सत्ता नाहीं, सामर्थ्य नाहीं, स्वाभिमान नाहीं, एकराष्ट्रीयत्त्व नाहीं, असे पारतंत्र्यजन्य दोषच त्यांचे अंगीं चिकटेविले जातात.

हिंदुस्थानालाहि तो कटु प्याला प्यावा लागलाच. हिंदुस्थान म्हणजे वाघा-सापांचा देश, त्यांतील अस्पृश्यांना माणसांपेक्षां व स्त्रियांना जनावरांपेक्षां हीन रीतीनें वागविण्यांत येतें, नवऱ्याबरोबर जाळून घेण्याची चाल, नदीला मुलें अर्पण करण्याची रूढि, पाळण्याशीं बाशिंग बांधण्याइतकी बालविवाहाची पद्धत—एक ना दोन, अमेरिकेंतील रेड इंडियन् व आशियांतील हे इंडियन्—दोघेहि सारखेच; नीग्रोप्रमाणें हेहि अशिक्षित, असंस्कृत, गाईला—नागाला पूजणारे लोक अशा गैरसमजाचा विषारी वायु गेलीं दीड-दोनशें वर्षें पसरविला

जात आहे. तो नाकातोंडांत गेल्यामुळें आमच्यांतीलच कांहीं शहाणे आत्मनिंदेच्या कलेंत प्रवीण झाले !

**“ हिंदुधर्मच जगाला तारील ”**

पाण्यावर शेवाळे किंवा अग्निवर राख साचते ना? तशाच या धार्मिक रूढि. शेवाळें सांचलें म्हणून तळें बुजवा व राख सांचली म्हणून अग्नि विझवा हा उपदेश हितशत्रूच करतात. शेवाळें दूर सारून थंडगार पाणी पिणें व राख झाडून विस्तव धगधगीत पेटविणें हेंच विवेकी माणसाचें कार्य. तें स्वामी विवेकानंद—रामतीर्थां-प्रमाणेंच राधाकृष्णन् यांनींहि मोठ्या प्रमाणांत पार पाडलें. या महत्तम कार्यासाठीं त्यांनीं आपली लेखणी व वाणी दोन्हींहि चंदनाप्रमाणें झिजविली; आणि तेंहि हेतुपुरस्सर. हिंदुधर्माला उजळा देणें व त्या हिंदुधर्माचें तेज जगाच्या दृष्टीस पाडणें हें त्यांनीं आपलें जीवित-कार्य ठरविलें. ‘ हिंदुधर्मच जगाला तारील ’ हा दृढविश्वास त्यांच्या श्वासा-श्वासांतून प्रगट होतो. त्यांनीं ‘ इंडियन् फिलॉसफी ’ नांवाचा दीड हजार पृष्ठांचा ग्रंथ लिहिला, तो केवळ आपल्या पांडित्याच्या प्रदर्शनार्थ नव्हे. “ भारतीय तत्त्वज्ञान निवेदन करणें हें या ग्रंथाचें मुख्य कार्य नाहीं; तर पाश्चात्य विचार-परंपरेच्या कक्षेंत तें आणून सोडणें हा माझा उद्देश आहे” असें त्यांनीं त्यांत स्वच्छ म्हटलें आहे. या ग्रंथाच्या द्वारें, अभिमानबुद्धीनें वस्तुस्थितीचा विपर्यास न करतां, साधार व सोपपत्तिक रीतीनें, नवीन परिभाषेनें, बुद्धिग्राह्य व तर्कपूत शैलीनें, त्यांनीं सर्व जगताला सिद्ध करून दाखविलें कीं, तत्त्वज्ञानाची किंवा अध्यात्मविचाराची भरारी साऱ्या जगांत जितकी उंच पहावयास सांपडते तितकी ती भारतीय शास्त्रांत सांपडल्याशिवाय रहात नाहीं.

" There is hardly any height of spiritual insight or rational philosophy attained in the world that has not its parallel in the vast stretch that lies between the early Vedic Seers and The Modern Naiyayikas. "

**आत्मपरीक्षणाची दृष्टि**

' आपलें तेवढें चांगलें ' या दुरभिमानानें राधाकृष्णन् यांचें मन पछाडलेलें नाहीं. 'जुनें तें सोनें' असें मानण्या-इतकी संकुचित किंवा स्थितिप्रिय विचारसरणी त्यांची नाहीं. त्यांना ख्रिश्चन विद्यालयांत इंग्रजी शिक्षण मिळालेलें आहे. त्यामुळें त्यांना हिंदु-धर्मांतील दोष ढळढळीतपणें दिसतात. " क्रौर्य, हिंसा, अज्ञान, धर्मभोळे-पणा, दुबळेपणा आणि पाशवी रूढि " यांचे काळेकुट्ट कलंक हिंदु-धर्माला लागलेले आहेत हें ते छातीठोकपणें सांगतात; पण त्याबरोबरच ते हेंहि सांगतात कीं, हिंदुधर्माची नाडी अद्याप शाबूत आहे; त्याचें तत्त्व अभंग आहे. त्या तत्त्वाकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच आपण सत्ता, संपन्नता व सामर्थ्य यांना मुकलों आहों व पारतंत्र्यांत, दैन्यांत व दौर्बल्यांत खितपत आहों.

**पाश्चात्यांची नाडीपरीक्षा**

आपल्या धर्माची अशी विवेचक ओळख आपल्या धर्मबंधूंना व अन्यधर्मीयांनाहि करून देणें एवढेंच एकेरी कार्य राधाकृष्णन् यांनीं आपल्या शिरावर घेतलेलें नाहीं. त्याच्या जोडीला जडवादी पाश्चात्य समा-जाचें काय चुकतें आहे, त्यांच्या तत्त्वज्ञानांत कोणती उणीव आहे व ती दूर कशी करतां येईल हें सांगण्याचें कामहि

त्यांनीं आपल्या अंगावर घेतलेलें आहे. जगाच्या वृक्षावर बसलेल्या दोन्ही पक्ष्यांना आज दाणापाणी मिळत नाहीं. आजमितीला सर्व जगाचीं सत्ता-सूत्रें पाश्चात्यांच्या हातीं आलेलीं असलीं, रंगून-पेकिंगमधील तिजोऱ्यांच्या किल्ल्या त्यांनीं आपल्या कनवटीला अडकविलेल्या असल्या आणि शस्त्रें व शास्त्रें, नीति व राजनीति या सर्व बाबतींत पाश्चात्य लोकांनीं जगाचें गुरुत्व आपल्याकडे घेतलेलें असलें; तरी त्यांचीं मनें पोखरलेलीं आहेत, समाज विस्कळलेला आहे आणि शांतता, निर्भयता, बंधुता या दैवी संपत्तिचा तेथें दुष्काळ आहे.

**भौतिकशास्त्रांच्या भट्टींत**

" अंतःकरणाच्या या नंगेपणा "बद्दल बर्नार्ड शॉसारखे दूरदर्शी लेखक व सी. ई. एम्. जोडसारखे समाजशास्त्रज्ञहि हळहळ व्यक्त करतात.

" आमच्या धर्माचे अनुयायी पुष्कळ, पण त्यावर श्रद्धा थोड्यांचीच; आणि जितका शिकलेला जास्त तितकी त्याची श्रद्धा कमी " अशी कुरकुर तिकडे चालू आहे. तिचें एक कारण म्हणजे भौतिक शास्त्राच्या भट्टींत टिकून राहण्याइतका ख्रिश्चन धर्म युक्तिग्राह्य नाहीं. डार्विनच्या उत्क्रांतिवादापुढें बायबलमधील सहा दिवसांतील जगदुत्पत्ति खरी कोण मानील ? पृथ्वी स्थिर आहे अशी समजूत आतां पोपनें शेंकडो आज्ञापत्रें काढलीं म्हणून कोणी पतकरील काय ? दारु व पाव यांवर मंत्राची फुंक टाकतांच त्यांचें रक्तमांस बनतें यांवर आतां कोण, कशी श्रद्धा ठेवील ? स्वर्ग व नरक हे आभाळांत आहेत आणि प्रलयकालीं थडग्यांतील सर्व आत्मे खडबडून उठतील व त्यांच्या पापपुण्याचा झाडा व निकाल होईल हें भाकित कोणता जाणता माणूस ग्राह्य मानील ?

धर्मकल्पनेला बुद्धिवादानें एकीकडून असा सुरुंग लावला आहे; तर यंत्रयुगानेंहि पाश्चात्यांना अस्वस्थ करून सोडलें आहे. आर्थिक स्वास्थ्य लाभलें पण मानसिक स्वास्थ्य त्यांना विन्मुख झालें. भौतिक शोधांचे एकापेक्षां एक उंच मजले बांधले; पण अंतरात्म्याचा शोध लावण्याची जिज्ञासा अतृप्त राहिली, नव्हे खालीं खालीं दबली जाऊं लागली. संस्कृतिचीं आभरणें वाढलीं पण हृदय पूर्वीइतकेंच असंस्कृत राहिलें. "रानटी लोकांसारख्याच आमच्या भावना आहेत, शाळेंतील मुलांइतकीच आमची संस्कृति बाल आहे" अशी आत्मपरीक्षा चिकित्सक पाश्चात्य करूं लागले. "पाश्चात्य सुधारणा काय करते? तर दहावीस संशोधकांनीं शोध लावावे आणि ते रानटी व खोडसाळ अशा बहुसंख्य लोकांच्या हातीं सोंपवावें." असें वर्णन करण्यांत येतें. एक बोलपटाची कलाच घ्या. ती अस्तित्वांत येण्यासाठीं किती प्रज्ञावंतांची बुद्धि काम करीत होती! थक्क करून सोडणाऱ्या अनेक कलांचा संगम त्या बोलपटाच्या निर्मितीला कारण झाला आहे. पण त्या बोलपटांत कोणतीं दृश्यें, कोणतीं कथानकें, कोणते विचार प्रदर्शित केले जातात? असंस्कृत मानवाच्या पाशवी विकारांना गुदगुल्या करण्याचे कामींच ते सारे शोध राबत आहेत! समाजाची मानसिक उंची वाढल्याविना नुसत्या भौतिक उत्कर्षानें काय मिळणार?

**संस्कृति सुधारली काय?**

एक यंत्र शंभर माणसांचें काम उरकतें. त्यामुळें मिळालेली फुरसद मानसिक, बौद्धिक वा आत्मिक सौख्यसंपादनासाठीं खर्च करण्याची कुवत आजच्या पाश्चात्य समाजाची नाहीं.

**माणूस व्हा!**

**" पांखराप्रमाणें आकाशांत उडण्याला आपण शिकलों आहोंत, माशाप्रमाणें पाण्यांत पोहण्याला आपण शिकलों आहोंत; पण माणसाप्रमाणें जगांत वागायला आपण शिकलों नाहीं. "**

याबद्दल मॅक्झिम गॉर्की यानें खेद प्रदर्शित केला आहे. पाश्चात्यांच्या या भौतिक उत्कर्षाचें पण मानसिक अपकर्षाचें निदान अचूकपणें करून

न वित्तेन तर्पणीयो मनुष्यः । त्यागेनैकेनामृतमानशुः ॥

या सत्यज्ञानानें मार्गदर्शन करण्याचे कामीं राधाकृष्णन् यांनीं आपली रसना कैक वर्षें शिणविली.

" सर्व सुधारणांचा आत्मा म्हणजे आत्म्याची सुधारणा "

The soul of all improvements is the improvement of soul.

हा दिव्यमंत्र त्यांनीं पाश्चात्य राष्ट्रांना दिला; व तो श्रवण करण्यासाठीं पाश्चात्य राष्ट्रें त्यांच्या चरणापाशीं जाऊन बसलीं. लंडनच्या विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. एफ्. ई. बेस यांनीं त्यांचीं ' हिबर्ट व्याख्यानमाला ' ऐकून असे स्पष्टच उद्गार काढले कीं,

" Today we have sat again at the feet of a great Indian Teacher. "

( २ )

# विद्यापीठांतील विक्रम

मद्रास प्रांत हा बुद्धिमत्तेबद्दल विशेष प्रसिद्ध. गुजरात म्हणजे जशी व्यापाराची खाण किंवा बंगाल म्हणजे जसें भावनेचें भांडागार; तशी मद्रासची ख्याति बुद्धिवैभवाबद्दल. गणित असो, संस्कृत असो, इंग्रजी असो, या विषयांत मद्रासचें पाऊल पुढें. पदार्थविज्ञानशास्त्रांतील शोधाबद्दल नोबेल पारितोषिक कमावणारे सर चंद्रशेखर रमण हे मद्रासचेच. त्यांचा व राधाकृष्णनांचा जन्म एकाच वर्षीं झाला. दोन देदीप्यमान तारे एकाच वेळीं क्षितिजावर उदय पावले, चमकूं लागले व जगताला दिपवूं लागले. योगायोग असा कीं, या दोघांहि बृहस्पतींचा जीवनप्रवाह कांहीं अंतरापर्यंत एकाच दिशेनें वहात गेला. मात्र दोघांची प्रत्यक्ष भेट झाली तिशीनंतर! इतकें निकट साम्य दोन समकालीन लोकोत्तर पुरुषांत क्वचितच दृष्टीस पडतें. दोघांनींहि ' शाळेच्या चिमण्या जगांत ' बाळपणिचा रम्य काळ काढला तो वाल्टेर येथें. आसमंतांतील मनोहर सृष्टिसौंदर्यावर लोळत त्यांनीं मोठ्या मजेंत शाळेंतील शिक्षण संपविलें. राधाकृष्णन् १५ व्या वर्षीं मॅट्रिक झाले, तर रमण १२ व्या वर्षींच ती परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढें झटकले. १९०४ मध्यें रमण बी. ए. झाले तेव्हां पहिल्या वर्गांत आलेले ते एकटेच विद्यार्थी होते. राधाकृष्णन् यांनीं हा एकुलतेपणाचा मान एम्. ए. च्या परीक्षेचे वेळीं पटकावला. रमण एम्. ए. झाले ते

अर्थात् प्रथम श्रेणींत,पण त्याशिवाय गुणांचे बाबतींत 'विक्रम' करून ! विशेष हें कीं, या ' राधा-रमणांना '-दोघांनाहि कलकत्ता विद्यापीठाचे गुणज्ञ कुलगुरु सर आशुतोष मुकर्जी यांनीं आपल्या विद्यापीठाला येऊन मिळण्याचें निमंत्रण दिलें. या दोघां बुद्धिमंतांनीं आपल्या ज्ञानाचे किरण दिगंतापर्यंत पसरवून मान्यतेचें अर्घ्य स्वतःस व स्वतःच्या राष्ट्रास मिळवून दिलें. विदेशी विद्यापीठांनीं त्यांच्यावर पदव्यांचा पाऊस पाडला. नोबेल पारितोषिक रमण यांना १९३० सालीं अर्पण करण्यांत आलें. राधाकृष्णन् यांना आज ना उद्यां तो मान मिळाल्या-विना रहाणार नाहीं.

**परधर्माची पकड**

एकोणिसावे शतकांतील तो काळ. देश परतंत्र, धर्म भ्रष्ट आणि जनता दीन झालेली. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे व धार्मिक सुधारणेचे प्रयत्न यांनीं अजून मूळ धरलें नव्हतें व उच्च समाजहि निद्रिस्तच होता. मद्रासकडे तर राजकीय पारतंत्र्याचा पगडा बराच आधीं बसलेला. राजसत्तेच्या बळावर ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं आपलें जाळें दूरवर पसरलेलें. विद्यालयें व रुग्णालयें हीं त्या जाळ्यांतील आमिषें. त्यावेळीं पंजाबमध्यें मुसलमानी धर्माची पकड इतकी जबरदस्त होती कीं, लाला लजपत-रायासारखा मोहराहि अर्धचंद्राखालीं जाण्याच्या विचारांत होता. मद्रासकडे क्रॉसचा प्रसार द्रुतगतीनें झाला. मिशनचीं मोठमोठीं कॉलेजें मद्रासमध्यें दिसतात. त्यांचें धर्मप्रसाराचें कार्य रुजण्याला अनुकूल अशी भुसभुशीत मद्रासची भूमि होती.जीर्ण धर्मकल्पनांनीं ती पोखरलेली होती. दागिन्यांतील सोनें जावें आणि लाखेचा गोळा रहावा, त्याप्रमाणें इष्ट धर्मतत्त्वें जाऊन दुष्ट चालीरीती मात्र जनतेचें

नरडें धरून बसल्या होत्या. अशा वातावरणांत वाढलेल्या कर्मठ पित्याचे पोटीं सर्वपल्ली यांचा जन्म झाला. मद्रासपासून चाळीस मैलांवर तिरुतनी नांवाचें धार्मिक क्षेत्र आहे, तें त्यांचें जन्मग्राम. बारावे वर्षापर्यंतचा त्यांचा बाल्याचा काळ तिरुतनी व तिरुपती या धर्मक्षेत्रांतच गेला. एका जमीनदाराचे पदरीं तहशीलदार म्हणून त्यांचे वडील काम करीत. त्यांची सांपत्तिक स्थिति बेताची होती. त्यांना मुलें सहा—एक मुलगी व पांच मुलगे. सर्वपल्ली हें द्वितीय अपत्य. त्यामुळें शारदेच्या मंदिराचा मार्ग लक्ष्मीच्या झगझगाटांत त्यांना आक्रमितां आला नाहीं. गरिबीशीं टक्कर देत देत ते तत्त्वज्ञानाचा एक एक प्रांत काबीज करीत गेले.

**चिंतनाची गोडी**

लहानपणापासून सर्वपल्ली यांच्या बुद्धिची चमक दिसून येई. ख्रिश्चन शाळेंत त्यांचें शिक्षण झालें. वयाच्या पंधराव्या वर्षीं १९०३ मध्यें ते प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाले. शाळेंतील परकें ख्रिश्चन वातावरण व घरची कर्मठ हिंदु शिकवण या दोन कांठांमधून सर्वपल्ली यांचे विचार या वेळीं वहात असत. त्यांची वृत्ति जात्याच चिंतनशील. एकांतांत बसावें आणि खूप विचार करावा याची त्यांच्या मनाला विशेष गोडी. सोबतीसवंगडी गोळा करावेत, त्यांच्याशीं हंसत-बोलत रमावें, सफरी काढाव्या, खेळाचे सामने द्यावे, ही आवडच नाहीं. ग्रंथ हेच इष्टमित्र. ईश्वरावर श्रद्धा दृढ व तिची ज्वाला आपत्कालीं उफाळलेली. एकटें बसावें, पुस्तक वाचावें आणि चिंतन करावें हा सर्वपल्लीचा दिनक्रम. ‘ एकांतीं बोललों बहु ’ ही त्यांची उपजत प्रवृत्तिच. त्यामुळें त्यांचा स्वभाव संकोची, लाजाळू असा असे. आतांहि

जगावरील चारी खंडांत व त्या खंडांतील बड्याबड्या लोकांत ते संचार करून व छाप पाडून आले असले, तरी एकांताची आवड व संकोचशील स्वभाव हे त्यांचे गुण सुटलेले नाहींत. मिशनरी शिक्षक हिंदुधर्मांतील व्यंगें वेंचून काढून त्यावर चोंचा मारीत;तेव्हां सर्वपल्लीच्या हृदयांत भाले शिरल्यासारखें होई; त्यांचा हिंदुत्वाचा अभिमान मनांतल्या मनांत खवळे. वेलोर येथें त्यांनीं कॉलेज गांठलें, तेंहि अमेरिकन मिशनचें होतें. मध्यमवर्गीय पालकाला आपल्या मुलांना थोड्या खर्चांत शिकविण्याची सोय मिशनऱ्यांनीं घातलेल्या ' पुस्तकी पाणपोईंतच ' करतां येई. कॉलेजांतील पहिल्या वर्गांत उत्तम यश संपादून सर्वपल्ली यांनीं मद्रास येथील ख्रिश्चन कॉलेजांत प्रवेश केला.

आधींच इंग्रजी शिक्षण आणि तेंहि ख्रिश्चन कॉलेजांतून दिलेलें.

**दूषित चष्म्यांतून**

महाराष्ट्रांत मालाकारापूर्वीं ' वाघिणीचें दूध ' प्यालेले सुशिक्षित जसे गरगरां डोळे फिरवूं लागले होते, स्वत:चें तेवढें कुचकामाचें मानीत होते आणि 'नवें तें हवें' या धोरणानें चालत होते;तशीच ' बे-शुद्ध ' अवस्था मद्रासप्रांतांतील आंग्ल-शिक्षितांचीहि झाली होती .खुद्द राधाकृष्णन् यांच्या बुद्धीवरहि त्या मोहनास्त्राचा अंमल कांहीं काळ होताच. त्यांनीं १९०५ सालापासून चार वर्षें भारतीय व पाश्चात्य या तत्त्वज्ञानांचा अभ्यास कसून केला. बुद्ध–शंकराचार्य आणि कणाद-मध्वाचार्य यांच्या जोडीला प्लेटो-अरिस्टॉटल, कांट-हेगेल वगैरेंनाहि त्यांनीं सत्याची ' वाट पुसली. '

पाश्चात्य ग्रंथ वाचतांच त्यांच्या मनावर असा पगडा बसला कीं, आपला हिंदुधर्म अपुरा आहे. राजकीय पारतंत्र्य हिंदुस्थानाचे कपाळीं

आलें याचें कारणहि आपला दुबळा वेदांत, आपला पंगु धर्म. इंग्रजी शिक्षणानें बुद्धिवादाचा जो ' दिव्य चक्षु ' प्राप्त झाला, त्यामुळें त्यांना हिंदुधर्म हा युक्तिग्राह्य नाहीं, विवेकाच्या कसोटीला टिकणारा नाहीं फार काय, नैतिक दृष्ट्याहि सदोष आहे अशीं विपरीत दृश्यें कांहीं काळ दिसूं लागलीं. प्रत्यक्ष व्यवहारांत जेथें तेथें हिंदूंचा पाय , मागें, त्यांची मान खालीं. या दुरवस्थेचें कारण आपण आपल्या धर्माचें केलेलें आचरण हें नसून त्याचा आपण केलेला अव्हेर हें आहे हा विवेकानंदांचा सिद्धांत

The evil lies not with,but against the Religion

त्यांच्या गळीं अद्याप उतरावयाचा होता. बुद्धिवादाशीं सुसंगत व समाजहिताला पोषक असा आपला धर्म नाहीं हें ज्ञान झाल्यामुळें राधाकृष्णन् यांचें मन मनस्वी खिन्न होई, हताश बने आणि ' यांतून मार्ग कसा सांपडेल ? ' या विचारानें तें बेचैन होई. मात्र त्यांच्या हिंदुत्त्वप्रेमाचें संवर्धन करण्याचें कार्य स्वामी विवेकानंदांनींच केलें. त्यांचे उज्ज्वल विचार वाचून सर्वपल्लींची हिंदु-धर्मावरील श्रद्धा दृढतर झाली. अवांतर वाचनाकडे लक्ष पुरविलें तरी सर्वपल्लींनीं आपल्या अभ्यासांत खळ पडूं दिला नाहीं. वयाच्या सतराव्या वर्षापासून त्यांनीं तत्वज्ञानाच्या अभ्यासाकडे आपलें मन वळविलें. १९०७ मध्यें ते बी. ए. झाले ते पहिल्या वर्गांत आणि त्यानंतर दोन वर्षांनीं एम्. ए. च्या पदवीचें शिखर त्यांनीं गांठलें तेंहि त्याच मानानें. विशेष हें कीं, १९०९ सालीं मद्रास विद्या-पीठाच्या एम्. ए. च्या परीक्षकांनीं एकाच विद्यार्थ्याला यश मिळवूं दिलें आणि तो विद्यार्थी म्हणजे राधाकृष्णन्.

परीक्षांतील प्रावीण्यामुळें त्यांना नोकरीची वाट पहावी लागली नाहीं.

**यशस्वी शिक्षक**

एम्. ए. होतांच "मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेज"नें त्यांना तत्त्वज्ञानाचे उप–प्राध्यापक नेमलें. शिक्षकाचा झगा अंगावर चढवावयाचा तर अध्यापनशास्त्राची माहिती पाहिजे म्हणून १९१० सालीं त्यांनीं एल्. टी. ची परीक्षा दिली. तरतरीत बुद्धि, मोहक वक्तृत्त्व, विशाल व्यासंग आणि शिकविण्याची हौस या चतुरंग गुणांच्या बळावर राधाकृष्णन् यांनीं शिक्षण-क्षेत्रांतील यशोदुर्ग हां हां म्हणतां सर केला. त्यांच्याकडे विद्यार्थी झेप घेत, ज्ञानमकरंद लुटून नेत व नंतर त्यांच्या गुणवत्तेच्या गुंजारवानें दशदिशां निनादित करीत. उत्कृष्ट शिक्षक असा त्यांचा लौकिक एकसारखा पसरत चालला. दुय्यम प्राध्यापकाचे जागेवरून त्यांची बढती करण्यांत आली व १९१६ सालीं ते 'प्रांतिक श्रेणि' (प्रॉव्हिन्शिअल ग्रेड) मधील प्राध्यापक बनले. चार वर्षांनंतर तर त्यांना 'साम्राज्य-श्रेणींत' (इंपीरियल ग्रेड) समाविष्ट करण्यांत आलें. याहून वरचें स्थान देण्याला सरकाराजवळ दुसरें कोणतें असणार? भरपूर द्रव्यप्राप्ति, मुबलक फुरसद आणि हौसेचें अध्यापनकार्य यामुळें राधाकृष्णन् यांचा हा काल जसा सुखाचा तसाच प्रगतीचाहि ठरला. पौरस्त्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा आपला अभ्यास त्यांनीं वाढीस लावला.


त्यांच्या ज्ञानाचें तेज पुस्तकाच्या रूपानें विद्यालयाबाहेरील जगांतहि

**विद्यापीठांच्या मागण्या**

पडूं लागलें. त्या तेजाचा लाभ आपल्याला मिळावा अशी इच्छा म्हैसूर विद्यापीठाला सहजच झाली. तें विद्यापीठ १९१६ तच स्थापन झालें होतें. सुरुवातीला उत्तम संच

असावा या हेतूनें त्यानें मद्रास विद्यापीठाकडे राधाकृष्णन् यांचेसाठीं याचना केली. १९१८ ते १९२३ या पांच वर्षांत त्यांनीं म्हैसूर विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम केलें. तेथेंहि यशोदेवता त्यांच्या कंठांत माळ घालण्यास पुढें आलीच.

विद्यापीठाच्या क्षितिजावर उगवलेला हा तेजस्वी तारा पहाण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांतील विद्वान आपापल्या दुर्बिणी लावून बसले. कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु सर आशुतोष मुकर्जी हे खरे गुणज्ञ. त्यांनीं आपल्या विद्यापीठांतील तत्त्वज्ञानाची शाखाच राधाकृष्णन् यांच्या हातीं सोपविली.



( ३ )

# पाश्चात्यांना पौरस्त्य धर्माची शिकवण

"ततः किम्" हा प्रश्न विचारीत असलेल्या पाश्चात्य समाजाची शंका-निवृत्ति करण्याची संधि राधाकृष्णन् यांना ऐन तारुण्यांतच लाभली. अवघें अडतीस वर्षांचें वय. पण तेवढ्यांत त्यांच्या व्यासंगाचा व वक्तृत्वाचा लौकिक हिंदुस्थानांत सर्वत्र दरवळला होता. कलकत्ता व म्हैसूर या विद्यापीठांनीं तर त्यांच्या अलौकिक गुणांचा भरपूर लाभ घेतलाच; पण त्यांचीं भाषणें व ग्रंथ यांनीं भारतीयांना आपल्या प्राचीन धर्माकडे नव्या दृष्टीनें पहाण्यास शिकविलें. आणि १९२६ सालीं तर त्यांची गुणवत्ता हिंदुस्थानाच्या चतुःसीमेपलीकडे गेली.

**भौतिक सुधारणांची मर्यादा**

त्याच वर्षीं केंब्रिज येथें ब्रिटिश साम्राज्यांतील विद्यापीठांचीं 'काँग्रेस' भरणार होती. तिला आपला प्रतिनिधि म्हणून कलकत्ता विद्यापीठ राधाकृष्णन्-शिवाय दुसऱ्या कोणाची निवड करणार? ते इंग्लंडला जाणार अशी बातमी हिंदुस्थानांतून बाहेर पडतांच इंग्लंडांतील विविध संस्थांकडून राधाकृष्णंन् यांना व्याख्यानांचीं निमंत्रणावरून निमंत्रणें येऊं लागलीं. पूर्वेकडील तत्त्वज्ञान म्हणजे कांहीं तरी गूढ आहे, कोडें आहे, गुहेंत बसून योगासनें करावयास सांगणारें निवृत्तिपर आहे असे नाना प्रकारचे गैरसमज

पाश्चात्य विद्वानांमध्येंहि घर करून बसलेले होते. त्यांचें निराकरण करून घेणें हा जसा एक निमंत्रणाचा हेतु, तसाच आपल्या जड-वादांतून उद्‌भवलेल्या अस्वस्थतेवर कांहीं तोडगा राधाकृष्णन् सांगतात कीं काय हें पहावें हाहि दुसरा हेतु निमंत्रकांचा असे.

यांत्रिक शोध वाढले तरी मानवी सुखें वाढलींच असें मात्र नाहीं. दुपारीं लंडनला व रात्रीं पॅरिसला जेवावें इतका द्रुत प्रवास करणारीं वाहनें निघालीं, पण उरलेल्या वेळाचें काय करावें ही चुटपूट पाश्चात्य लोकांना लागली. पूर्वींच्या रूढि ढासळल्या, समजुती बुडाल्या, बायबलवरील श्रद्धा उडाली; मात्र त्यांच्याजागीं नवें श्रद्धेय कांहीं आलें नाहीं. आयुष्याला ध्येय काय ? हें प्रश्नचिन्ह सर्व पाश्चात्य राष्ट्रांपुढें उभें राहिलें. विशेषत: तरुणपिढी शंकेखोर, तुच्छताखोर (Cynic) बनत चालली. निसर्गाशीं युद्ध करून त्यांतील संहारक शक्तींना मानवानें काबूत ठेवलें; तरी तेवढ्यानें निराशा, दु:ख व्हावयाचें टळलें नाहीं. असाध्य रोगांचें निर्मूलन साध्य झालें, शिक्षणप्रसारामुळें ज्ञान फैलावलें, व्यक्तिस्वातंत्र्य वाढीस लागून मनुष्यत्व उंचावलें, नरमांसभक्षण किंवा गुलामगिरी यांसारख्या राक्षसी रूढिंची राखरांगोळी झाली, झगड्याचा निवाडा करण्यासाठीं द्वंद्वयुद्धें किंवा चित्तरंजनार्थ माणसाबैलांच्या साठमाऱ्या बंद पडल्या, चेटकी म्हणून जोन ऑफ आर्कसारख्या दैवी वीरबालेला जीवंत जाळण्याची आसुरी पद्धत नष्ट झाली अशा किती तरी सुधारणेच्या व सुखाच्या पायऱ्या आपण झपाझप् चढलों, असें समाधान पाश्चात्य राष्ट्रें किंचित्काल मानूं शकतात.

**मानसस्पर्धेंतील पंगुता**

पण किंचित्कालच ! निसर्गाच्या शक्तींचें तांडव सुरु झालें कीं आपण किती अवश आहोंत; आपली शक्ति किती मर्यादित आहे व आपण निसर्गावर मिळविलेले विजय किती अल्प आहेत याची त्यांना चरचरीत जाणीव होते. बुद्धिसर्वस्व खर्चून बनविलेली ' टिटॅनिका ' बोट पहिल्याच सफरींत जलसमाधि पावली. विमानें वगैरे यांत्रिक शोधामुळें युद्धाचें घातक स्वरूप अधिकच भीषण झालें. जंतुशास्त्राचा उपयोग ( ! ) रोग-निवारणाप्रमाणेंच शत्रुसैन्यांत रोग-प्रसाराचे कामीं होऊं लागला. युद्ध करण्याची महत्त्वाकांक्षा, जगाला गवसणी घालण्याचा लोभ, संपत्तीचा हव्यास व सत्तेची लालसा, परस्पराविषयीं मत्सर व साशंकभाव इत्यादि मनोविकार पूर्वीइतकेच प्रबल, नव्हे अनावर आहेत असें पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांना दिसून येऊं लागलें. याशिवाय मृत्यु, प्रलय, धरणीकंप वगैरे किती तरी आपत्ति दुर्लंघ्यच आहेत. त्या आल्या असतांहि चित्तशांति अखंड ठेवण्याचें साधन पाश्चात्यांचे हातीं उरलेलें नाहीं.

**जित माणसाचे विजय !**

तें साधन पुरविण्याचें कार्य राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानांनीं केलें; आणि तें इतक्या यशस्वितेनें केलें कीं, त्याबद्दल त्यांचेवर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला. अंधारांत चाचपडणाऱ्या माणसाला लख्खदिशीं चमकून जाणारा विजेचा लोळ अकस्मात् दिसावा; तसा आंग्लसमाज राधाकृष्णन् यांच्या तेजस्वी विचारांनीं दिपून गेला. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या मँचेस्टर कॉलेजांत ' अप्टन् लेक्चर्स ' नांवाची व्याख्यानमाला होत असते. तींत व्याख्यान देण्याचा

मान हा विद्वानांनाहि अभिलषणीय वाटावा इतका मोठा आहे.एकाहि हिंदी माणसाला—जित माणूस कां कोठें ज्ञाता असतो ? वक्ता असतो ?—तो मान मिळालेला नव्हता. पण तो पोलादी अडसर राधाकृष्णन् यांच्या विद्वत्तेच्या तेजानें वितळून गेला. त्यांना त्या व्याख्यानमालेंत सहा पुष्पें गुंफण्याची विनंति करण्यांत आली. तीं पुष्पें म्हणजे "Hindu View of Life" नांवानें प्रसिद्ध झालेला त्यांचा ग्रंथ. त्याचें भाषांतर फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांत झालें असून इंग्रजींत दुसरी आवृत्ति निघाली आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठाचे पावलावर पाऊल टाकून केंब्रिज विद्यापीठानेंहि राधाकृष्णन् यांना व्याख्यान देण्याची विनंति केली. तेथील व्याख्यानास इंग्लंडांतील नामांकित तत्त्ववेत्ते, तर्कपंडित वगैरे विद्वान् लोक उपस्थित होते. त्या सर्वांना माना डोलावयास लावणारें असेंच राधाकृष्णन् यांचें भाषण झालें. चाळिशीच्या आंतील हिंदी तरुण; पण आपल्यापेक्षांहि सफाईदार इंग्रजी बोलून आपल्याला नवा दृष्टिकोण देऊन जातो याचें वृद्धवृद्ध आंग्ल विद्वानांना कौतुक वाटल्याविना राहिलें नाहीं. तें कौतुक, तें आश्चर्य, ती कृतज्ञता, जो तो आपापल्या परीनें व्यक्त करी. 'मॉरल सायन्सेस् क्लब' पुढें 'ब्रॅडले व शंकराचार्य' या विषयावर राधाकृष्णन् यांचें जें भाषण झालें, तें श्रवण करून एक जाडे प्राध्यापक म्हणाले, "केंब्रिज विद्यापीठाच्या चतु:सीमेंत आजवर कोणाहि हिंदी वा इंग्रज माणसानें भारतीय तत्त्वज्ञान इतक्या उत्तम रीतीनें विशद केलें नाहीं. राधाकृष्णन् यांची स्पष्टीकरणाची पद्धत पाश्चात्य श्रोतृवृंदाच्या अंत:करणाला भिडणारी आहे."-त्यांचीं व्याख्यानें 'युग-प्रवर्तक' (Epoch-making) झालीं असें वर्णन 'दि गार्डियन्' या पत्रानें केलें.

**शर्यतीशीं शर्यत !**

या मान्यतेचें व धन्यतेचें शिखर गांठलें 'अप्टन' व्याख्यान-मालेचे वेळीं. हिंदी माणसाला तो अपूर्व मान मिळाला खरा; पण योगायोग असा कीं, राधाकृष्णन् यांचीं व्याख्यानें ठरलीं ती वेळ तेथील "नौका-विहाराचीं" होती. त्या क्रीडेला विशेष महत्त्व होतें. निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची ती बोटिंगची शर्यत अत्यंत चुरशीची व जिज्ञासेची असे. विद्यार्थी व प्राध्यापक, पट्टेवाला व प्रिन्सिपॉल—झाडून सारे लोक ती शर्यत पहाण्यास न चुकतां जात; मग दुसरा कसलाहि कार्यक्रम बुडाला तरी बेहेत्तर. पण अशी विरुद्ध ओढ असतांहि राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानाचे वेळीं सभागृहांत मुंगीलाहि रीघ नव्हती ! राधाकृष्णन् यांच्या भाषण-प्रवाहावर चाल-केली पौरस्त्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानांची शर्यत पहाण्यांतच सर्वजण गुंग !

'विक्रम केलांत तुम्ही' असे उद्गार ती बौद्धिक शर्यत संपल्यावर प्रिन्सिपॉल जॅक्स यांनीं काढले; एवढेंच नव्हे तर, आभार मानतांना त्यांनीं अशी प्रांजल कबुली दिली कीं, "आज आमच्या मनांत आध्यात्मिक विचारांचा नवाच प्रकाश पडला. व्याख्यान चालू असतां त्यांत असे कांहीं क्षण आले कीं, तेव्हां "तर मग मी हिंदु होतों" असें म्हणण्याचा मोह मला पडला."

या अवर्णनीय वक्तृत्वाचें वर्णन करण्यासारखें एक वैशिष्ट्य असें कीं, राधाकृष्णन् यांनीं वक्तृत्वाचा कला म्हणून कांहींहि अभ्यास केलेला नाहीं. तोंडांत गोट्या धरण्याचे श्रम किंवा माळरानांतील दगडापुढें हातवारे करण्याचे सायास त्यांना घ्यावे लागले नाहींत. तो त्यांच्या वाणीचा सहज विलास आहे. त्यांचें वक्तृत्व म्हणजे 'देणें ईश्वराचें'.

त्यांचें पहिलें सार्वजनिक भाषण झालें तें इंग्लंडांत १९२६ सालीं. त्यापूर्वीं विद्यालयाच्या वर्गांत ते जें कांहीं बोलत, तीच वक्तृत्व-कलेची उपासना. पण त्यांच्या व्याख्यानाचें पुष्प इंग्लंडांत जें उमललें, तेंच अगदीं भरघोस आणि त्याचा परिमल जगभर पसरला. गरुडा-सारखीं त्यांची पहिलीच झेप थेट आकाशापर्यंत जाऊन पोचली. एक एका पावलांत त्यांनीं युरोप व अमेरिका हीं दोन्ही खंडें पादाक्रांत केलीं !

उमटली. १९२६ च्या जुलैमध्यें इंग्लंडांतील प्रशंसेचे पुष्पहार कंठांत बाळगून राधाकृष्णन् यांनीं अमेरिकेचें प्रस्थान ठेवलें.

**जागतिक परिषदेंत पताका फडकविली**

त्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यांत हार्वर्ड विद्यापीठामध्यें "जागतिक तत्त्वज्ञान परिषद्" भरावयाची होती. तिला आपला प्रतिनिधि पाठवावा असें कलकत्ता विद्यापीठानें ठरविलें. कोण ? हा प्रश्नच नव्हता. त्यांनीं राधाकृष्णन् यांना इंग्लंडमधून परभारें अमेरिकेला जाण्यास सांगितलें. मशाली पाजळीत, अजिंक्यपत्रें मिळवीत, या देशाहून त्या देशाला जाणाऱ्या प्राचीन काळच्या पंडिताप्रमाणें राधाकृष्णन् इंग्लंडांतून अमेरिकेस गेले. हिंदी संस्कृतीची पुण्याई पाठीशीं बांधून व नवीन शास्त्रांचा चष्मा डोळ्याला लावून त्यांनीं अमेरिकेंत पदार्पण केलें. जडवाद व अध्यात्मवाद यांच्या उपयोगाच्या मर्यादा सांगण्याचें काम त्यांच्याकडे होतें. पूर्व व पश्चिम यांमध्यें पूल बांधणारे स्थापत्यविशारद ते ठरणार होते. त्यांना बुद्धिवादी जगाला श्रद्धेचें महत्त्व पटवून द्यावयाचें होतें, उपयुक्ततावादी जनतेला अध्यात्मवाद पटवावयाचा होता आणि तें कार्य त्यांनीं सोळा आणे बजावलें. 'तत्त्वज्ञान परिषदेंत' ती उंच, सडसडीत, रुमाल घातलेली मूर्ति जेव्हां उभी राहिली आणि तिच्या मुखावाटें आपल्या मनांतील शंका, अस्वस्थता, उदासीनता समर्पक शब्दांच्या रूपानें वाक्यावाक्यांतून प्रगट होऊं लागली; तेव्हां सर्व जगांतील ते तत्त्वजिज्ञासु पंडित सर्वांगाचे कान करून ऐकूं लागले. खुर्ची किंचित् हलली तरी त्याचा आवाज सर्वांना ऐकूं जाईल इतकी गाढ शांतता त्यांच्या व्याख्यानाचे वेळीं नांदत होती.

( ४ )

# अमेरिकेंतील यशःश्री

" His lectures flow in a stream of perfectly-turned sentences which would put most English speakers to shame."

—C. E. M. Joad

हिंदुस्थानांतून इंग्लंडला; तसे इंग्लंडांतून अमेरिकेला राधाकृष्णन् यांना जाणें भाग पडलें. त्यांच्या इंग्लंडांतील व्याख्यानांची कीर्ति अमेरिकेपर्यंत तत्काळ जाऊन पोंचली. आणि अमेरिकेचें रक्त-ताजें. आंग्लभूमि व अमेरिका यांचें नातें मायलेकीचें. तरी कांहीं बाबतींत लेक ही आईपेक्षां अधिक उंच दिसते. भौतिक सुधारणांचें अत्युच्च शिखर गांठलें आहे अमेरिकेनेंच; आणि म्हणून आध्यात्मिक भूक जास्त लागली आहे अमेरिकेलाच. अजीर्णानंतर लंघनाची व प्रवासानंतर विसाव्याची खरी गरज. म्हणूनच आधुनिक शोधांनीं नखाशिखान्त नटलेली अमेरिका १८९३ सालीं एका भारतीय यतिपुढें नम्र झाली होती. त्या वर्षी शिकागो येथें 'सर्वधर्मपरिषद' भरली-तींत स्वामी विवेकानंदांनीं भारतीय तत्त्वज्ञानाची ध्वजा फडकाविली व अमेरिका तत्त्वतः जिंकलीच ! ऐहिक शोध व दैहिक सुखें यांना विटून गेलेली अमेरिकन जनता त्यांचे केवळ भजनीं लागली. त्यानंतर तेहतीस वर्षांनीं अमेरिकेंत भारतीय तत्त्वज्ञानाची 'राजापुरी गंगा'

उन्हानें कासावीस झालेल्या माणसानें थंडगार व सुवासित पाणी घटघटा पिण्यांत तल्लीन व्हावें, तसा अनुभव तो श्रोतृवृंद घेत होता. मध्येंच अमेरिकेंतील विवाहाची क्षणभंगुरता राधाकृष्णन् विनोदानें वर्णीत, तेव्हां श्रोत्यांमध्यें खसखस पिके.

**शाश्वत शांतीचा एकमेव मार्ग**

क्वचित् विनोद, क्वचित् उपरोध, यांनीं त्यांचें व्याख्यान जिवंत वाटे. बेकारीपासून जागतिक शांततेपर्यंत जे भीषण प्रश्न पाश्चात्य जनतेला खावयास उठले आहेत, त्यांना उत्तर देऊं शकेल एकटें हिंदु तत्त्वज्ञानच हें त्यांनीं साधार पटवून दिलें. आपली दृष्टि अंतर्मुख करून विश्वामध्यें भरून राहिलेलें एकच एक तत्त्व ओळखलें पाहिजे ही भारतीय तत्त्वज्ञानाची दीक्षा त्यांनीं अमेरिकन लोकांना दिली. जगांत जें ' नानात्त्व ' दिसतें, त्यांमध्यें माळेंतील दोऱ्याप्रमाणें ' एकत्त्व ' कसें अनुस्यूत आहे हें त्यांनीं आधुनिक पद्धतीनें विशद केलें. केवळ स्वतःचा, केवळ दृश्य जगाचा विचार करून भागणार नाहीं; जगाच्या बुडाशीं एक तत्त्व खेळत आहे; तें जाणण्यासाठीं आपण आपली बुद्धि शुद्ध केली पाहिजे, तिच्यावरील कामक्रोधादि विकारांचे डाग पुसून टाकले पाहिजेत, यम-नियम-आसनादिंच्या द्वारें चित्तशुद्धि झाली म्हणजे,

**वायुर्यथैको भुवनं प्रविष्टो**
**रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ।**
**एकस्तथा सर्वभूतांतरात्मा**
**रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥**

या विश्वात्म्यैक्याची साक्ष पटते. आणि तशी साक्ष पटल्यानंतरच 'शाश्वत शांति' प्राप्त होते, एरवीं नाहीं; असें प्रतिपादन करून ' उत्तिष्ठत ! '

असा संदेश त्यांनीं अमेरिकन श्रोत्यांना दिला. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या सूत्राची अतिपरिचयामुळें हिंदुस्थानांत अवज्ञा होते. आणि चालवून चालवून झिजलेलें नाणें जसें निकामी होतें; तसें तें महावाक्य सतत कानीं पडल्यानें निरर्थक भासूं लागलें आहे. पण त्यांतील सर्वच्या सर्व अर्थ नवीन परिभाषेनें उकलून दाखविण्यांत राधाकृष्णन् यांचा हातखंडा आहे. त्यांच्या हातांतील या 'जादू' चें वर्णन मि. जोड यांनीं पुढील सुंदर शब्दांनीं केलें आहे. "At his touch the dead bones of Indian lore spring to new life."

**पुनः इंग्लंडवर स्वारी !**

अमेरिका खंडांत 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' करून राधाकृष्णन् हिंदुस्थानांत डिसेंबर महिन्यांत परत आले. विजेता होऊन आलेल्या आपल्या सुपुत्राचें स्वागत जित मायभूमीनें कसें केलें असेल हें सांगावयास हवें काय ? आंध्रप्रांत ही राधाकृष्णन् यांची जन्मभूमि. तेथील विद्यापीठानें डी. लिट् ही पदवी त्यांना अर्पण केली. १९२७ सालीं मुंबई येथें भरलेल्या 'इंडियन् फिलॉसाफिकल कॉंग्रेस'च्या तिसऱ्या अधिवेशनाचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. १९२९ च्या ऑक्टोबर महिन्यांत मँचेस्टर कॉलेजांत 'धर्मांचा तौलनिक अभ्यास' करण्याची शाखा निर्माण करण्यांत आली. त्या शाखेचे प्रमुख म्हणून राधाकृष्णन् यांचीच निवड झाली. लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेजांत 'हिबर्ट व्याख्यानमाला' गुंफण्याचा मान त्यांना देण्यांत आला. 'लंडन-मधील महत्त्वाची घडामोड' असें वृत्तपत्रांत त्यांच्या व्याख्यानांचें वर्णन करण्यांत आलें. हीं व्याख्यानें An Idealist view of life या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं. त्या व्याख्यानांच्या अध्यक्षांनीं

समारोपांत असे प्रशंसोद्गार काढले कीं, " राधाकृष्णन् यांच्या विचारांची घनता, प्रतिपादनाची तेजस्विता आणि भाषेची संपन्नता यांचा आम्हांला हेवा वाटतो, त्याबद्दल आमचे चित्तांत आदर उत्पन्न होतो आणि आपल्याला कांहीं ही गुणसंपदा लाभणार नाहीं अशी निराशाहि वाटूं लागते. "

**मिशनऱ्यांना लाज वाटली**

राधाकृष्णन् यांच्या व्याख्यानामुळें इंग्रजांचा जसा इंग्रजीचा गर्व गळाला; तसाच ख्रिश्चन कर्मठांचा ख्रिश्चन धर्माचा दुरभिमानहि पळाला. राधाकृष्णन् यांनीं वर्णिलेला हिंदुधर्म ज्या देशांत हजारों वर्षे नांदत आहे; तेथें आपला अवघें वीस शतकांचें वयोमान असणारा पंथप्राय ख्रिस्तीधर्म उपदेशिणें—" शरम वाटते आम्हांला आम्ही तिकडे मिशनरी पाठविले याची " अशी कबुलीच एका थोर आंग्लबाईनें राधाकृष्णन् यांचेजवळ त्यांचें व्याख्यान संपल्यावर दिली. Kalki हा आपला सूत्रग्रंथ याच सुमारास प्रसिद्ध करून राधाकृष्णन् हे १९३० च्या जुलैमध्यें नवनव्या विजयमाला कंठांत धारण करून मातृभूमीला परत आले. १९३१ सालीं सरकारनें 'सर' ही पदवी अर्पण करून—त्यांचा म्हणण्यापेक्षा—त्या पदवीचा गौरव केला.

**हिंदुस्थानांतील कार्य**

आतां राधाकृष्णन् हे केवळ हिंदुस्थानाचे राहिले नाहींत. पाश्चात्यांच्या भौतिक शास्त्रांचा 'शोधप्रकाश' भारतीय तत्त्वज्ञानावर टाकण्याचें कार्य करण्यासाठीं त्यांची हिंदुस्थानाला जितकी गरज होती; तितकीच हिंदुस्थानांतील आध्यात्मिक विचारसंपदा क्षुधित अंतःकरणाच्या पाश्चात्यांना पोंचविणें हेंहि कार्य त्यांची वाट पहात

होतें. कलकत्ता विद्यापीठांत त्यांचें अध्यापनाचें नियत कर्तव्य चालू होतेंच. त्याशिवाय लेख व भाषणें यांच्या रूपानेंहि ते आपल्या नव-विचारांचा लाभ हिंदी जिज्ञासूंना देत होते. त्यांनीं १९११ सालीं अमेरिकेंतील ‘ सार्वराष्ट्रीय नीतिशास्त्रा ’वरील त्रैमासिकांत गीता व कांट यावर एक छोटासाच लेख लिहिला. पण त्यांतील विचारांचें स्वतंत्रत्व व नावीन्य इतकें होतें कीं, लो. टिळकांनीं मंडालेस असतांना तेथें तो लेख मागवून घेतला व गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत त्याचा मुद्दाम उल्लेख केला. ब्रिटिश ज्ञानकोशकर्त्यांना राधाकृष्णन् यांचें चरित्र देण्यासाठीं चार ओळींची जागा जरी मिळाली नाहीं; तरी त्यांचेकडून ‘ भारतीय तत्त्वज्ञानावर ’ लेख मात्र लिहून घेऊन त्यांत त्यांनीं तो अंतर्भूत केला !

**कर्मयोगाची शिकवण**

धर्म म्हणजे निवृत्ति, धर्म म्हणजे दैववाद अशा भेकड कल्पनांचा विध्वंस ते आपल्या लेखांनीं करतात व धर्म म्हणजे कृति, धर्म म्हणजे कर्तव्यपालन अशी कर्मयोगाची शिकवण देतात. त्यामुळें हिंदुसमाज त्यांचे विचार ऐकण्यासाठीं आतुर असतो. ‘ दिधली स्थिति देवानें तींतचि सुख ’ मानण्याची प्रवृत्ति त्यांनीं आपल्या लेखांभाषणांनीं खोडून काढली आहे. कर्मवाद, प्रयत्नवाद यांच्या विचारांचा झंझावात ते जसा हिंदुस्थानांत उत्पन्न करतात; तशीच युरोप-अमेरिकेमध्यें आत्मज्ञानाची आवश्यकताहि प्रतिपादतात. धर्माचें खरें कार्य आत्म्याची ओळख करून देणें हें होय; असें ते बजावतात. निरनिराळ्या व्याप-संतापापासून व आधि-व्याधिपासून तुम्ही आपलीं शरीरें मुक्त केलीं कीं आपल्या जन्माचें सार्थक झालें असें तुम्हांला म्हणतां येणार नाहीं;

तर अज्ञान, मोह, लोभ व मत्सर इत्यादि विकारांपासून मनाची सोडवणूक करून शुद्ध अंतःकरणानें आत्मानंद सेवन करणें हेंहि मानवाचें अंतिम व परम कर्तव्य होय असा उपदेश ते पाश्चात्य जनतेला करीत असतात. अशा विचारांचें अमृत-पान धर्मशून्य, ध्येय-शून्य, सौख्यशून्य होत जाणाऱ्या आपल्या तरुण पिढीला घडवावें, म्हणून राधाकृष्णन् यांना पाश्चात्य विद्यापीठें वारंवार बोलावतात.

१९३६ सालीं त्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठानें पंधरा वर्षांसाठीं 'स्पालिंडिग प्रोफेसरशिप्' देऊं केली. धर्मांचा तौलनिक अभ्यास हा विषय त्यांचा आवडीचा व अभ्यासाचा. त्यामुळें त्यांनीं हें निमंत्रण स्वीकारणें इष्टच. पण त्याबरोबरच आपल्या मायभूमीच्या सेवेला आपण कसें मुकावें हा पेंच त्यांना पडला. शेवटीं त्यांनीं हा पेंच-प्रसंग सोडविण्यासाठीं ऑक्सफर्ड येथें वर्षांतून सहाच महिने जाण्याचें कबूल केलें. १९३९ सालीं दक्षिण आफ्रिकेंत त्यांना व्याख्यानाचें निमंत्रण आलें, तेव्हां ते तिकडे जाऊन आले.

**हिंदुविद्यापीठाचे सूत्रधार**

हिंदुस्थानांत राहून कलकत्ता विद्यापीठातर्फे त्यांनीं वीस वर्षांवर अध्यापनाचें कार्य केलें. तथापि त्या विद्यापीठाला अशा अलौकिक विद्वानास सोडणें योग्य कसें वाटेल? पण वियोगाचा तसा योग १९४१ मध्यें आला. जसे सर आशुतोष मुकर्जी, तसेच पं. मदनमोहन मालवीय यांचीहि शोधक नजर सर्व हिंदुस्थानभर फिरत असते. एकादा एकनिष्ठ भक्त देशोदेशींहून दुर्मिळ फुलें गोळा करून त्यांची माला आपल्या देवतेच्या कंठांत ज्या तत्परतेनें घालतो, त्याच वृत्तीनें पं. मालवीयजी हिंदुस्थानांतील प्रांतो-

प्रांतींच्या विद्वद्रत्नांचा शोध घेऊन, त्यांना उचलून, काशी येथील आपल्या " हिंदुविद्यापीठां "त आणून ठेवतात. किती तरी महाराष्ट्रीय विद्वान त्या अलौकिक संस्थेंत प्राध्यापकाचें कार्य करीत आहेत! आतां आपण ऐंशींच्या घरांत आलों, तेव्हां आपल्या शिरावरील भार दुसऱ्या समर्थ व्यक्तीचे खांद्यावर द्यावा असा विचार पं. मालवीयजींच्या मनांत खेळूं लागला.

त्यावेळीं त्यांचे डोळ्यापुढें पहिली व्यक्ति उभी राहिली ती म्हणजे डॉ. राधाकृष्णन् यांची. हाडाचा हिंदु, रोमरोमांत आस्तिक्य भिनलेलें, ज्ञानाचा अक्षय्य भाता पाठीशीं बांधलेला, जिव्हाग्रावर वक्तृत्त्वकला नृत्य करीत असलेली आणि पूर्व कर्तृत्त्वाच्या लौकिकाचें तेजोवलय मुद्रेभोंवतीं पसरलेलें, असा 'वारस' राधाकृष्णन्शिवाय मालवीयजींना दुसरा कोण दिसणार? त्यांची विनंति राधाकृष्णन् यांनीं मान्य केली व कुलगुरु या नात्यानें हिंदुविद्यापीठाची जोखमीची धुरा त्यांनीं आपल्या खांद्यावर घेतली. या संक्रमणाचे काळीं त्यांच्या गुणवत्तेचा आणखी एक पुरावा जगापुढें आला. त्यांची माननीय सेवा ध्यानीं घेऊन कलकत्ता विद्यापीठानें त्यांचा करावयाचा तो गौरव तर केलाच, पण त्याशिवाय त्यांना चालू असलेला पगार आजन्म देण्याचें योजलें. पूर्वी दिलेला तनखा हा केलेल्या कामाचे मानानें कांहींच नव्हे असाच याचा अर्थ नाहीं काय?

---

( ५ )

# मार्गदर्शक मतसंपदा

"There are thousands of men and women today, who are hungry to hear the good news of the birth of a new order."

**प्रा. राधाकृष्णन्.**

**संस्कृतीचें घड्याळ**

एका पाश्चात्य पंडितानें जगांतील संस्कृतींचें वर्णन घड्याळ्याचे रूपकानें केलें आहे. जगाच्या पाठीवर आजवर निरनिराळ्या संस्कृतींचे उदयास्त झाले. त्यांचें महत्त्व किती हें घड्याळाच्या परिभाषेंत त्यान सुरेख रीतीनें समजावून दिलें आहे. एक मिनिट म्हणजे शंभर वर्षें हें प्रमाण गृहीत धरलें पाहिजे. या संस्कृतिरूपी घड्याळांतील दोन्ही कांटे आरंभीं बारावर आहेत अशी कल्पना करा. त्यावेळीं जगांतील सुधारणेचें केंद्र इजिप्त व बॅबिलोन येथें होतें. तेथून मिनिटकांटा सरकूं लागला. एक घर ओलांडून त्यानें पांच मिनिटें पुरीं केलीं तेव्हां ( म्हणजे पांचशें वर्षांनीं ! ) क्रीट हें संस्कृतीचें आदिपीठ होतें. संस्कृतीचा हा कांटा १२ वाजून १० मिनिटांनीं ॲसीरियांत शिरला व १२ वाजून १५ मिनिटांनीं त्यान खाल्डियांत प्रवेश केला. १२ वाजून २० मिनिटें झालीं आणि भारतीय व चिनी संस्कृतींना जगाचें गुरुत्व घेतलें, असें त्या पंडिताचें मत आहे. आणखी पांच मिनिटांनीं इराणमध्यें

व साडेबारा वाजतां ग्रीसमध्यें संस्कृतींचा कांटा गेला. १२-३५ ला इजिप्त व १२-४० ला रोम यांचें वर्चस्व सुरू होऊन १-२ वाजून ४५ मिनिटांनीं युरोपीय संस्कृतीचा उदय झाला. एक वाजतां गेलें महायुद्ध झालें व दुसरें महायुद्ध म्हणजे युरोपीय संस्कृतिचा विनाश ! तो न झाला तरी ती संस्कृति आतांच खिळखिळी झालेली आहे.

या घड्याळाचे रूपकावरून कोणता फरक दिसतो ? राधाकृष्णन् यांचे मतें, युरोपीय संस्कृति उणीपुरीं पंधराशें वर्षेच टिकेल असें वाटतें आणि त्याचें कारण तिचें अधिष्ठान जडवाद आहे हें होय. उलट आशियामधील संस्कृति अध्यात्मनिष्ठ असल्यानें त्या अडीच हजार वर्षें टिकल्या—अजून टिकून आहेत व पुनः गुरुत्व मिळवूं पहात आहेत.

सर्व जगाची प्रगति व्हावयाची तर एका संस्कृतींतील गुण-संपदा दुसऱ्या संस्कृतींत संक्रमित करणें अवश्य आहे. हें विशाल कार्य ज्या महाभागांनीं आपल्या शिरावर घेतलें, त्यांत राधाकृष्णन् यांची गणना कोणीहि करील. त्यांनीं भारतीय संस्कृतिचें सूक्ष्म निदान केलें, तिच्यांतील दोष वेंचून काढले व सत्तत्त्वें निश्चित केलीं; उलटपक्षीं पाश्चात्य संस्कृतिचीहि चिकित्सा करून तिच्यांतील एकएका अवगुणाची कारण-मीमांसा त्यांनीं केली. लग्नापासून लढाईपर्यंत आजकालच्या बहुतेक सर्व प्रश्नांची तपासणी करून या धन्वंतरीनें औषध-योजना किती कौशल्यानें केली आहे हें क्रमशः पहाणें हिताचें होईल.

तत्त्वज्ञान हें राधाकृष्णन् यांच्या संदेशाचें अधिष्ठान. पण त्याचा अभ्यास करून काय करावयाचें? अशीच विचारसरणी पुष्कळांची असते. "तुमचा तो धर्म, तें अध्यात्म नि तें तत्त्वज्ञान — बस्स् झालें आतां. त्यानेंच तर हिंदुस्थान पंगु बनला. त्याचा अभ्यास म्हणजे आंधळ्या माणसानें अमावस्येच्या रात्रीं काळोख्या खोलींत दडलेल्या काळ्या मांजराचा शोध लावण्याइतकेंच उपयुक्त. त्यापेक्षां भौतिक शास्त्रांचा आम्ही व्यासंग करूं. त्या शास्त्रांमध्यें आपण जगाच्या मागें दोनशें वर्षें आहों. त्यांत आधीं धांव मारूं मग बघूं तुमचें तें तत्त्वज्ञान वृद्धपणीं." अशा विचारांच्या लाटा तरुण मनांत सध्यां जोरानें उसळत आहेत. त्यांना पटेल अशा पध्दतीनेंच राधाकृष्णन् हे तत्त्वज्ञानाचें महत्त्व जागोजाग प्रतिपादितात. भौतिक विद्या आत्मसात् करा व त्यांत प्रभुत्व मिळावा असा उपदेश करून तत्त्वज्ञानाविषयीं ते म्हणतात,

**तत्त्वज्ञानाचा उपयोग काय?**

"ज्यावेळीं आपल्यावर महान् संकट कोसळतें, आयुष्यांतील अत्यंत बिकट कालांतून जेव्हां आपल्याला जावें लागतें, धक्के बसून, पराभव पावून व हताश होऊन जेव्हां आपल्याला आपल्याभोंवतीं अंधःकाराशिवाय कांहींच दिसत नाहीं, जीवनांतील सारी जादू जेव्हां नाहींशी झालेली असते आणि 'ईश्वरा! तूं मेलास का रे?' अशी आपण हांक फोडतो किंवा "देवा रे देवा! माझा अव्हेर कां करतोस?" असा टाहो फोडतो, आणि त्या आर्त आळवणीलाहि जेव्हां कांहींच उत्तर मिळत नाहीं, बुद्धीचा आधार डळमळतो व सारें जग गरगरां फिरत आहे असा भास होतो; तेव्हां त्या

तुफानाशीं झगडावयाला, आशेनें व धीरानें पुढें पाऊल टाकावयाला तत्त्वज्ञानासारखें साहाय्य दुसरें कोणीच करूं शकत नाहीं. कारण तत्त्वज्ञानाचें ध्येयच मुळीं मनुष्याला जागतिक बंधनांतून मुक्त करण्याचें, परिस्थितीचे स्वामी बनविण्याचें आणि जड वस्तूंच्या जुलूमांतून सोडविण्याचें आहे. जी वस्तु जग देऊं शकत नाहीं किंवा घेऊं शकत नाहीं अशा वस्तूंची गोडी लावणें हें तत्त्वज्ञानाचें उद्दिष्ट. त्याचें फल हेंच कीं, केवढेंहि अपयश येवो, केवढाहि अनर्थ कोसळो आणि निराशेचें केवढेंहि दुःख प्राप्त होवो, तत्त्ववेत्त्याला त्याची झळ लागत नाहीं. संपत्ति संपादणें म्हणजेच यश कमावणें असें म्हणाल, तर त्या अर्थानें तत्त्वज्ञ यशस्वी दिसणार नाहीं; पण पैशानें मापतां यणार नाहीं अशा सुखाचा लाभ तत्त्वज्ञान करून देतें. 'मनुष्य बनविणें' हें तत्त्वज्ञानाचें कार्य होय. अध्यात्माचीं मुख्य तत्त्वें जीं आत्मौपम्यबुद्धि, सर्वभूतानुकंपा, तीं ज्यांच्या अंतःकरणांत तारुण्यामध्येंच रुजलेलीं नसतील; त्यांना वार्धक्यांत तीव्र निराशा गांठते आणि जनावरांच्या डोळ्यांत जो दीनवाणा शून्यपणा दिसतो, तो त्यांच्या ठायीं उत्पन्न होतो." (Religion in Transition)

**पिकल्या पानांसाठीं नव्हे !**

सर्व आयुष्यभर 'पुरस्सर गदासवें' झगडण्यासाठीं आपण जसे शरिराचे स्नायु तरुणपणांतच व्यायामानें व आहारानें पीळदार व सुदृढ करतो; त्याचप्रमाणें मनाची ही तालीमहि जीवनाच्या प्रारंभींच करावयाची आहे, अंतीं नव्हे. लो. टिळकांनीं गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत गीताभ्यासासंबंधीं जो जीव तोडून उपदेश केला आहे, तो एकंदर तत्त्वज्ञानाच्या अभ्यासालाच लागू

पडण्यासारखा आहे. "संसार करून थकल्याभागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ" गीता नसून 'मनुष्यमात्राचें संसारांतील खरें कर्तव्य' सांगणारी ती आहे आणि "म्हणून पूर्ववयांतच संसाराचें हें प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणें शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकानें समजून घेतल्याखेरीज राहूं नये." अशी विनंति लोकमान्यांनीं केली आहे. तशीच विनंति राधाकृष्णन् जगाला करीत आहेत. आधुनिक सुधारणेंतील संधारक गुणांचें ते स्वागत करतात; पण तसें करतांनाच तिच्यांतील उणिवा दाखविण्यास ते विसरत नाहींत. रशियन प्रयोगाचा उल्लेख करून ते म्हणतात,

**आर्थिक क्रांतीची मर्यादा**

"आधुनिक सुधारणेमध्यें खरी उणीव कोणती असेल तर ती आध्यात्मिक अधिष्ठानाचीच. तीमुळें समाजाचे घटक वाळूच्या कणासारखे विस्कळीत होत आहेत, समाज हा तुरुंग मानला जात आहे, त्यांतून पळून जाण्याची प्रवृत्ति वाढत आहे. आर्थिक जीवन हें महत्त्वाचें असलें तरी तेंच मानवाचें संपूर्ण जीवन नव्हे, हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. मात्र आर्थिक व्यवस्था नीट ठेवून मनुष्याच्या शारीरिक गरजा भागविण्यास सर्वांना सारखी संधि देण्याचा राशियांतील प्रयत्न प्रामाणिकपणाचा आहे यांत शंका नाहीं. एकीकडे संपत्तिच्या राशी व दुसरीकडे लाखों लोक उपाशी ही विषमता नष्ट केली पाहिजे असें समाजवादी मानतात. रेल्वे, खाणी वगैरे सरकारी मालकीच्या नाहींत काय? त्यांतील नफा कोणा एका व्यक्तीच्या लहरीवर खर्चिला जात नाहीं. तीच स्थिती जीवनाच्या आवश्यक गोष्टीमध्यें यावयास पाहिजे; महत्त्वाचे धंदे राष्ट्रीय स्वामित्त्वाखालीं

यावयास पाहिजेत, याला विरोध असण्याचें कारण नाहीं. मात्र असें करतांना सोशॅलिझम् किंवा फॅसिझम् यांच्या हातून व्यक्ति-स्वातंत्र्य चिरडलें जाऊं नये. सर्वांचे जीव एका गणवेशांत उभे करण्याचें व 'सामुदायिक मोक्ष' साधण्याचे खटाटोप भयंकर आहेत. विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य नष्ट झाल्यानें नागरिकांना समाज हा तुरुंग वाटत आहे. राष्ट्र किंवा वंश यांचें माहात्म्य वाढवितां वाढवितां देवपदाला पोंचविलें जात आहे. सबंध राष्ट्रांतील माणसांचा एक कळप बनवून तो युद्धाच्या खाटिकखान्याकडे नेला जात आहे. शस्त्रास्त्रांची एकसारखी वाढ होत आहे. त्या वाढीचें प्रमाण इतकें अजस्र आहे आणि जनतेच्या भावना इतक्या वेगानें चेतविल्या जात आहेत कीं, लवकरच युद्धाची आपत्ति जगावर ओढवेल. आणि तीहि इतकी प्रचंड कीं, तिच्यापुढें गेलें महायुद्ध हें भातुकलींचेंच (Picnic) ठरावें !" (Religion in Transition)

**न्यायबुद्धीला चेतवणी**

१९३४ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत ही धोक्याची सूचना या तत्त्ववेत्त्यानें दिलेली आहे. नुसती सूचनाच नव्हे तर धोका टाळण्याचा मार्गहि त्यानें तेव्हांच सांगून ठेवलेला आहे. 'धरणीकंपानें वा जलप्रलयानें कांहीं घरें, कांहीं गांवें उध्वस्त होतात; म्हणून त्या संकटांच्या निवारणार्थ उपाय शोधण्यांत शास्त्रज्ञांची मति गढलेली आहे. मग त्यापेक्षां शतपट मानवी हानि करणाऱ्या युद्धांचें संकट टाळण्याचा विचार कां केला जाऊं नये ?" असा प्रश्न उपस्थित करून राधाकृष्णन् १९३६ सालीं लंडन येथें भरलेल्या "जागतिक धर्मपरिषदेंत" युध्दांची मीमांसा अशी करतात:—

"युद्धाची भीषणता व विफलता आपण पूर्णपणें जाणतों. तरीहि प्रवाहपतिताप्रमाणें आपण युद्धाकडे ओढले जात आहोंत. कां? कॉनरॅडनें एका गोष्टींत चिनी हमालांचा मूर्खपणा चित्रित केला आहे. ऐन वादळांत जहाज सांपडलें असतां ते हमाल आपापसाचा खून करण्यास प्रवृत्त होतात. कां? तर त्यांची पैशाची पिशवी हरवली होती.! आपणहि आपल्या राष्ट्राचें वैभव वाढावें म्हणून जागतिक संहाराला आवाहन करीत नाहीं काय? आपण जिंकलेल्या राष्ट्रावरील सत्ता सोडून जागतिक शांततेचा मार्ग मोकळा करीत आहों काय? व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, त्यांचें महत्त्व केवळ धनसंचयानें मोजलें जात नसून त्यागानेंहि ओळखलें जातें. राष्ट्राराष्ट्रांच्या परस्परविरुद्ध मागण्या निकालांत काढण्यास मानवाची न्यायबुद्धि समर्थ कां ठरूं नये? त्यांसाठीं युद्धाच्या नरकांतून, रक्तांच्या नद्यांतून चालत जाणें अवश्यच आहे काय? युद्धाच्या समाप्तीचे वेळीं विजेत्याचे विकार उचंबळलेले असतात. त्यामुळें त्यावेळचा तहनामा हा अन्यायाचा, जितांना अपमानाचा व सर्वांना नव्या उपद्रवाचा जनक होऊन बसतो. याचें उदाहरण म्हणजे व्हर्सायचा तह. तेव्हां युद्धाचा भडका अजून उडाला नाहीं तोंवर न्यायबुद्धीनें सर्व जगाचा विचार करणें हेंच हिताचें आहे."
(Eastern Religion and Western Thought)

**खरी लोकशाही कोणती?**

समाजाच्या सध्यांच्या घटनेंत मूलतःच एक विकृति आहे. ती म्हणजे समाजांत पुरेशी लोकशाही नांदत नाहीं. लोकशाहीचें मुख्य तत्त्व काय? तर व्यक्तीच्या जीवनाचें महत्त्व ओळखणें.

"दुसऱ्या व्यक्तीवर सत्ता चालविण्यास लायक अशी व्यक्ति असणें शक्य नाहीं आणि दुसऱ्या राष्ट्रावर प्रभुत्त्व ठेवण्यास योग्य असें राष्ट्र असणें शक्य नाहीं हा लोकशाहीचा सिद्धांत. पण आजची जगाची व्यवस्था काय आहे ? सबळांनीं शक्य तें करावें व दुर्बळांनीं प्रतिकार अशक्य म्हणून तें सहन करावें हाच दंडक जगभर चालू आहे ना ? अपमान पावलेल्या, निराश झालेल्या व चिरडलेल्या दुबळ्या राष्ट्रामधूनच मुक्ततेचा निर्वाणीचा उपाय म्हणून सर्वाधिकाऱ्यांना स्थान दिलें जातें. राष्ट्रसंघ हा सबळांच्याच हातांतील एक हत्यार ठरला. त्याचें स्वरूप आंतरराष्ट्रीय असलें तरी त्याचा कारभार पहाणारे लोक राष्ट्रीय वृत्तीचेच आहेत. तुडुंब पोट भरलेलीं राष्ट्रें व त्यांचे दुबळे अंकित यांनींच राष्ट्रसंघ बनलेला आहे. त्यामुळें त्याचे हातून जगांत सुव्यवस्था निर्माण होणें अशक्य आहे. आधीं न्याय, मग शांतता हें तत्त्व ओळखलें पाहिजे. प्रत्येक राष्ट्राला न्याय मिळाला म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता दूर नाहीं. महायुद्ध सुरू झाल्यास महान् राष्ट्रांना आपली किती तरी सत्ता खास सोडावी लागेल. तिचा अल्पांश जरी आज ते स्वेच्छेनें सोडतील तरी युद्धाचें संकट टळेल. उदारमतवादी राजकारण खेळणाऱ्या इंग्लंडनें या बाबतींत पुढाकार कां घेऊं नये ? आपल्या साम्राज्याला बंधुभावाचें स्वरूप देण्याचा व त्यांत कोणाहि स्वतंत्र राष्ट्रानें स्वेच्छेनें यावें अशी तरतूद करण्याचा इंग्लंडचा मानस आहे ना ? मग इंग्लंड हिंदुस्थानाला स्वतंत्र कां करीत नाहीं. ? आजचा हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्यांतील कच्चा दुवा आहे, इतर राष्ट्रांना हेवा वाटण्याचें स्थान आहे. जोंवर हिंदुस्थान परतंत्र

आहे, तोंवर इंग्लंडला जर्मनी, इटाली किंवा जपान यांना नांवें ठेवतां येणार नाहींत. आंतरराष्ट्रीय नीतीची आज पायमल्ली होत आहे. ती थांबवून न्यायाचें राज्य जगांत सुरु झालें तरच युद्ध टळेल व शांतता नांदेल." ( Religion in Transition ) .

**मातृभूमीची आठवण**

जगांत शांतता नांदण्यासाठीं राष्ट्रें स्वतंत्र झालीं पाहिजेत हें न्यायाचें आहे हा सिद्धांत पटविण्यास राधाकृष्णन् यांना स्वतःच्या देशाइतका विदारक दाखला दुसरा कोणता सांपडणार? त्यांनीं असें स्वच्छ म्हटलें आहे कीं, "आपली परंपरा व आपला इतिहास यांच्याशीं इमान राखून एक तरी इंग्रज हिंदुस्थानाचा स्वायत्ततेचा हक्क अमान्य करूं शकेल असें मला मुळींच वाटत नाहीं. हिंदुस्थानाचें पारतंत्र्य संपून त्याचें समता व सख्य यांवर आधारलेलें राजकीय सहकार्य इंग्लंडनें संपादलें तर जगाच्या इतिहासांत मोठीच भर पडेल" असें रम्य आशा-चित्र त्यांनीं रेखाटलें आहे. भौतिक प्रगति व आध्यात्मिक शांति यांच्या या सुंदर संगमाचें वर्णन हिंदुस्थानाचे व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगो यांनींहि कलकत्ता येथें भरलेल्या भारतीय व ब्रिटिश शास्त्रज्ञांच्या संयुक्त परिषदेंत केलें होतें. पण युद्धाची ठेच लागल्याशिवाय शांततारक्षणाचें शहाणपण शिकूंच नये असा मानवी स्वभाव आहे काय?

**धार्मिक प्रभुत्त्व व राजकीय दास्य**

"तुमचा धर्म इतका श्रेष्ठ, तुमचीं आध्यात्मिक ध्येयें इतकीं उच्च; तर मग राजकीय पारतंत्र्य तुमच्या कपाळीं कां?' अशी टीका कांहीं लोक करतात आणि म्हणतात, "तुमचे थोर

पुरुष प्रार्थना करीत राहिले व परचक्रें पाहत बसले. एकांतवास आणि संन्यास हे त्यांच्या जीवनाचे महामंत्र. फार तर, त्यांनीं कार्य केलें तें म्हणजे तपोभूमींतील मृगशावकाला गवताचे घास चारले, रात्रींच्या वेळीं आकाशांतील तारकांशीं गुजगोष्टी केल्या आणि क्वचित् ईशनामाचा महिमा लोकांच्या कानीं घातला."

या टीकेंत थोडेंफार तथ्य आहे, अगदींच नाहीं असें नाहीं. राष्ट्र या वस्तूचा हिंदुस्थानानें परवापर्यंत विचारच केला नव्हता. "भारतमाता" म्हणून देशाची भक्ति करण्यास अलीकडेच सुरुवात झाली आहे. आणि आपण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, धार्मिक आचरणामुळें विजय मिळत नाहींत आणि साम्राज्यें पसरत नाहींत. एका इंग्रज कवीनें म्हटलें आहे,

"'ईशाच्या स्मरणें अम्हांस मिळतें ऐश्वर्य हें', बोलती ।
वाटे फोल, कितीकदां विभव ये ईशाचिया विस्मृतीं ।।"

असें तर नसेल ना कीं, ज्या राष्ट्रांनीं आपला आत्मा कलिपुरुषाला विकला, त्यांना त्याची किंमत म्हणून तो कलि विस्तार व वैभव देत असेल? "तुम्ही माझ्या भजनीं लागा म्हणजे मी तुम्हाला स्वातंत्र्य, साम्राज्य वगैरे सारीं सौख्यें अर्पण करतों." असा सौदा तर सैतान करीत नसेल ना? बाह्य जगांतील जयापजय, मानापमान व लाभालाभ यांकडे भारतीयांचें लक्ष पूर्वीं गेलें नाहीं हें मात्र खरें. स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा न्याय्य हक्क असला, तरी परक्यावर स्वाऱ्या करून आपलें साम्राज्य स्थापणें ही राष्ट्राभिमानाची विकृति होय. त्यामुळें इंग्लंडला आपली दृष्टि स्वच्छ ठेवणें किंवा आपलें धोरण न्याय्य राखणें जड जात आहे. ऐश्वर्य

व सामर्थ्य यांचें महत्त्व भारतीयांना आध्यात्मिक साधन म्हणून तत्त्वतः पटलेलें होतें; पण त्यांच्या आचारांत तें महत्त्व ओळखलें गेलें नव्हतें. भारतीय संस्कृतीनें राजकीय अंगाकडे दुर्लक्ष्य केलें आणि त्याचें फळ म्हणजे त्याची सध्यांची अवनति.

**राजकारणांतील अध्यात्म**

आतां पाश्चात्यांच्या सहवासामुळें हिंदवासियांमध्येंहि राष्ट्रीयत्वाची भावना प्रज्वलित झाली आहे. आणि स्वातंत्र्याची न्याय्य मागणी सरळपणें मान्य झाली नाहीं तर सामुदायिक शस्त्राचारानेंहि तें मिळवावें, या विचारापर्यंत कांहीं जणांची मजल गेलेली आहे. पण आजच्या क्षणाला हिंदुस्थानचें राजकीय पुढारीपण हें एका धार्मिक साधूच्या हातीं गेलेलें आहे. आपल्या राष्ट्राच्या धार्मिक परंपरेला व सात्त्विक विचाराला अनुरूप अशा मार्गानें हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा अहिंसात्मक उपाय त्या महात्म्यानें शोधून काढला आहे. सामुदायिक प्रमाणावर कोणीहि सत्याग्रह आजवर आचरलेला नाहीं. तो यशस्वी झाल्यास; हिंसाप्रधान युद्धाशीं तुल्यबल असें हें नैतिक साधन हिंदुस्थानानें जगाला उपलब्ध करून दिलें असें होईल. पराभूत व दीनदलित हिंदुस्थान अजून आध्यात्मिक मार्गावर आहे याचेंच हें प्रत्यंतर होय. आध्यात्मिक मार्गानें हिंदुस्थान चालत गेला म्हणून त्याची अवनति झाली आहे अशी कुरकुर करणें योग्य नाहीं. उलट, आध्यात्मिक मार्गानें तो पुरेसा चालून गेला नाहीं हें त्या अवनतिचें कारण होय. कांहीं धर्मात्मे अंतरात्म्याचा शोध घेण्यासाठीं समाजापासून पळून जातात. पण तसें करणें याचा अर्थ जगांत थोडे पुरुषश्रेष्ठ उत्पन्न होणें, पण एकंदर मानव-

जातीची उन्नति न होणें. समाजाची सुव्यवस्था हें आध्यात्मिक माणसाचें प्रमुख ध्येय असलें पाहिजे."

**हिंदुधर्माचें अनुभूति-प्राधान्य**

"जगांतील धर्मांचे दोन वर्ग पाडतां येतात; एक जगच्चालक शक्तीवर श्रद्धा ठेवणारा व दुसरा तिचा साक्षात् अनुभव घेणारा. हिंदुधर्म दुसऱ्या कोटींतील आहे. केवळ ईशतत्त्वाची जाणीव बुद्धीला झाली म्हणजे जीविताचें साफल्य झालें असें तो मानीत नाहीं. त्या ईशतत्त्वाशीं एकरूप झाल्याची अनुभूति घेण्यास हिंदुधर्म उपदेशितो. भौतिक व आध्यात्मिक यांचा फरक करून मानवाचें जीवन अध्यात्मपर करण्यास हिंदुधर्म शिकवितो. ईश्वर मान्य करा वा न करा; आत्मानंदाचा अनुभव घ्या असें हिंदुधर्म म्हणतो. बौद्ध धर्माचा जो अष्टविध मार्ग आहे त्याचा शेवट समाधींतच होतो. सांख्य व जैन हे हिंदुधर्मपंथ ईश्वर मानीत नाहींत, पण आध्यात्मिक अनुभूति सत्य मानतात. "**आत्मप्राप्ति-लक्षणं मोक्षम्**" असें सर्वांचें मत आहे. विधिनिषेध, मंत्रतंत्र यांना गौण महत्त्व देऊन आत्म-प्रचीति करून घ्या असा हिंदु-धर्माचा संदेश आहे. "ईश्वराच्या सान्निध्यांत राहावें असे सर्वच इच्छितात, पण फक्त हिंदुच तें साध्य करूं शकतात." असे उद्गार अपोलोनियसच्या मुखांत फार प्राचीनकाळीं घातलेले आहेत.

**साक्षात्काराचें फळ**

सर चार्लस इलियट यानें स्वच्छ लिहून ठेवलें आहे कीं, "आत्मसाक्षात्कार ही संतांची अनुभवाची गोष्ट आहे. ती केवळ मनाचा भ्रम आहे असें म्हणून आपल्याला दूर सारतां येणार नाहीं. कारण

सर्व जनतेचें पूजास्थान झालेले हे साक्षात्कारी संत बुद्धीनें मोठे प्रखर होते असें त्यांच्या लेखनावरून दिसून येतें. अशा संतांचें सर्व राष्ट्रच्या राष्ट्र दीर्घकाल चिकाटीनें जें सत्य म्हणून घोषित करीत आहे; तें आपल्या मनोवृत्तीशीं जुळत नसलें, तरी आपल्याला आदरणीय वाटलें पाहिजे." आपण बुद्धिवाद व शास्त्रें यांचे भक्त आहोंत. धर्मग्रंथांतील वचनें तुम्ही मानूं नका हवीं तर; पण रोकडा अनुभव आपण कसा नाकारणार? आत्मसाक्षात्काराचा अनुभव ही सत्य घटना आहे. जीवनाच्या होमकुंडांत तो अग्नि पेटलेला आहे; त्याची जाणीव आपल्याला होत नाहीं असें म्हणतांच येत नाहीं. त्या होमकुंडांतील धुराचे लोट तुम्ही नाकाराल तर नाकारा; पण अग्नीचा स्पर्श सत्य आहे. साक्षात्कारी पुरुष हाच संपूर्ण जीव होय. त्याची बौद्धिक तृषा शमते व मानसिक अस्वस्थता सरते. अशा पूर्ण पुरुषामुळेंच समाजांत शाश्वत शांति व चिरकालीन ऐक्य नांदूं शकतें. अध्यात्माच्या प्रांतांत पाऊल टाकणें म्हणजे बुद्धि लाथाडणें नव्हे; तर बुद्धीच्या प्रांतांतून पलीकडे जाणें. विचार इतका करावयाचा कीं, साक्षात् ज्ञान हेंच त्याला फळ मिळावें."

**वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था**

"केवळ हिंदूंचा नव्हे, तर जगांतील अखिल मानवजातीचा विचार करून हिंदुधर्मानें मनुष्याचें ध्येय चतुर्विध ठरविलें आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ मानवाचें जीवन पूर्णत्वाला नेणारे आहेत. हें ध्येय साध्य व्हावें म्हणून मानवी आयुष्याचे चार भाग पाडले असून मानवी समाजाचेहि चार वर्ग कल्पिले आहेत.

ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम म्हणजे ज्ञानार्जन, संसार, आत्मचिंतन व विश्वप्रेम हीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं मानवी आयुष्याचे केलेले चार भाग होत. समाजालाहि ज्ञान, शौर्य, धन व सेवा या गुणांची गरज असते. ती गरज पूर्ण करण्याचे काम एकएका वर्गाकडे देणारी व्यवस्था म्हणजे चातुर्वर्ण्य. हे चार वर्ण म्हणजे मनुष्याच्या विकासाच्या चार पायऱ्या होत. सर्वजण जन्मानें शूद्र असतात असें मनु म्हणतो, याचा अर्थच मुळीं सर्वांनीं प्रारंभीं सेवेचे कष्ट सोसले पाहिजेत. दुसरी पायरी स्वतःच्या बुद्धीनें स्वतंत्र व्यवसाय करणें. त्यापुढची अवस्था म्हणजे मनांत महत्त्वाकांक्षा व मनगटांत शौर्य धारण करणें आणि सर्वांत श्रेष्ठ स्थिति म्हणजे ज्ञान मिळवून जीवन आध्यात्मिक बनविणें. सध्यांची समाज-व्यवस्था चढाओढीची आहे पण चातुर्वर्ण्यात्मक व्यवस्था ही श्रमविभागाची आहे. हें नियंत्रण थोडें जाचक वाटलें तरी आंधळ्या स्पर्धेपेक्षां बरें. हल्लीं सर्वांनाच मताधिकार देऊन राजपद विभागलें जातें व युद्धकाळांत सैनिक म्हणून सर्वांचिच भरती होते. यामुळें आपापल्या लायकीची कर्तव्यें पार पाडण्याचें स्वातंत्र्य सर्वांना लाभत नाहीं. खरे पाहिलें तर चातुर्वर्ण्यव्यवस्था हीच लोकशाहीची आहे. आध्यात्मिक दृष्ट्या तर ती सर्वांना समानताच देते, शिवाय प्रत्येक व्यक्तीच्या अंगभूत गुणांच्या विकासाला वाव देते. सारीं कामें समाजाच्या दृष्टीनें सारखींच उपयुक्त होत. समानता याचा अर्थ सर्व माणसांचें सामर्थ्य समान आहे असा कोणीच करीत नाहीं. आपल्या अंगीं जे गुण असतील, त्यांचा उपयोग मानवी प्रगतिला करून देण्या-

साठीं संधि मिळणें हाच समानतेचा अर्थ होय. मार्क्सनेंदेखील समानता याचा अर्थ प्रत्येकानें शक्य तें काम करावें व आपल्याला जरूर तें मूल्य घ्यावें असाच केला आहे.

"आध्यात्मिक, राजकीय व आर्थिक या तिन्ही शक्तींनीं समाज संपन्न असला तरच तो समतोल व सुव्यवस्थित राहतो. खेड्यांत गांवपंचायती व शहरांत व्यापारी गणसंस्था यामुळें येथील समाजाचा तोल पूर्वी राखला जाई. पण इंग्रज आल्यापासून नवी घडी बसली. हेस्टिंग्जच्या कारकीर्दीत शेतकऱ्याची जमीन ही विक्रीची वस्तु ठरली व जमीनदाराची दलाली सुरु झाली. उद्योगधंद्यांची शेतीपासून फारकत झाली व कारखान्यांतून सामुदायिक निर्मिति होऊं लागली. स्थानिक स्वराज्यें व गांवपंचायती धुळीस मिळाल्या. "आमच्या पार्लमेंटरी पद्धतीचीं मूळें दोन हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत रुजलेलीं होती." असें लॉर्ड झेटलंड यांनीं लिहून ठेवलें आहे. लोकशाहीच्या वाढीला वर्णसंस्था आड येत आहे हा आरोप निर्मूल आहे. मात्र एक खरें कीं, वर्ण-संस्थेंत जन्माचें प्राधान्य वाढलें तेव्हांपासून त्या संस्थेला जातिसंस्थेचें हीन स्वरूप प्राप्त झालें;कारण जात म्हटली कीं आनुवंशिकता आली; जन्मतः चिकटलेली जात आजन्म कायम रहाते, जातींतील माणसाशींच लग्न करणें अवश्य होतें आणि अन्नपानादि व्यवहारहि इतर जातीशीं करणें निषिद्ध ठरतें. खिस्तपूर्व १५०० ते ६०० या वैदिक कालांत वर्ण होते, जाति नव्हत्या. खिस्तोत्तर ३२० ते ४५० या गुप्त घराण्याच्या काळांत जाति अस्तित्वांत आल्या. त्याचवेळीं मनूनें जातींची व्यवस्था लावन दिली. शक, यवन वगैरे आक्रमक समाजांना हिंदु

म्हणून स्वीकारण्यांत आलें. पण त्यांना पृथक् ठेवण्यासाठीं विवाहा-वर निर्बंध घालण्यांत आले. भिन्न भिन्न वंशांना एकत्र पण अलग ठेवण्याची युक्ति म्हणजे अन्नलग्नव्यवहाराची बंदी घालणारी जाति-व्यवस्था. वर्ण चार असले, तरी जाति व पोटजाति शेंकडो-हजारो आहेत. वर्णव्यवस्थेंत अस्पृश्यतेला स्थान नाहीं, पण जातिव्यवस्थेंत तें आहे. जातिजातिंना एकाच अपराधासाठीं निरनिराळ्या शिक्षा सांगितल्या आहेत. हा जातिसंस्थेंतील मोठाच दोष होय. रामानुज आणि कबीर, नानक आणि चैतन्य, नामदेव आणि एकनाथ या सर्वांनीं जातिजातींतील विषमतेवर जोराचे हल्ले चढविले, तरी अद्यापि तें विषमतेचें विष नाहींसें झालें नाहीं. हिंदुस्थानांतील ख्रिस्ती प्रार्थनामांदिरांतहि जातिभेद पाळावा असें आज्ञापत्र एका पोपनें काढलें होतें! सरकार तर आपलें राज्य स्थिर करण्यासाठीं जाति-भेदाची पिंपळमुळीं खोल खोल रोवीत आहे. जातवार मतदार-संघामुळें राष्ट्रीय ऐक्याला विघ्न होत आहे. जातिबंधन न पाळणा-ऱ्यांवर समाज बहिष्कार टाकतो. आतां शिक्षणाच्या प्रसारामुळें, सामाजिक चळवळीमुळें व राष्ट्रीय आंदोलनामुळें जातिभेदाचे तट कोसळून पडत आहेत हें सुचिन्ह होय."

**भारतीय महिला**

"जगांत दोन प्रकारचे लोक असतात. हातानें जें स्पर्शितां येतें, तेंच तेवढें खरें असें म्हणणारे आणि या दृश्य सृष्टिखेरीजहि कांहीं शाश्वत तत्त्वें आहेत असें मानणारे, यांपैकीं दुसऱ्या ध्येयवादी कोटींत भारतीय महिला पडतात. पोकळ पोपटपंची न करतां रोकड्या आचरणानें त्या आपल्या रोजच्या जीवनांतील क्षुद्र घटनांना महत्त्व प्राप्त

करून देतात. माझ्या पिढींतील व जातींतील किती तरी स्त्रियांचीं लग्नें पाश्चात्यांच्या मानानें लहानपणीं झालीं. पण हे बालविवाह दु:खदायक झाले असें मात्र नाहीं. पांडित्याचीं पुटें न बसलेल्या भारतीय महिलेच्या चित्तावर उदात्त अशा आदर्श हिंदु गृहिणीचें चित्र कोरलेलें असतें. "पति चंचल असला तरी मी एकनिष्ठ राहिलें पाहिजे; त्याचें प्रेम उडालें असलें, तरी मी त्याच्यावर प्रेम केलें पाहिजे; तो दुसरीच्या पाठीमागें लागला असला, तर मला तो तेथून परत येण्याची वाट पाहिली पाहिजे." अशी हिंदु स्त्रीची श्रद्धा असते. तिला अंधभक्तीचा कलंक लागलेला आहे असें तुम्ही म्हणाल, तर तसा कलंक परमात्म्यालाच लागलेला आहे! आपण मिथ्या मोहाच्या नादीं लागून भटकतों, तरी तो परमात्मा आपल्यावर प्रेम करतो, आपण थकून-भागून परत येऊं म्हणून वाट पाहत असतो. आपल्या प्रिय व्यक्तीच्या दोषाकडे न पाहतां त्यावर निर्मल प्रेमाचा वर्षाव नि:शंकपणें करीत रहाणें ही खरोखर स्वर्गीय देणगी आहे. हिंदु स्त्रीचा संसार हा गाढ प्रेमानें भारलेला व मृदु भावानें भरलेला असतो. मात्र ज्या सामाजिक चालीरीती काळानें व परिस्थितीनें त्याज्य ठरविल्या आहेत, त्या बदलून टाकल्यास हिंदु संसाराचें चित्र अधिक उज्ज्वल दिसेल. सामाजिक बाबतींत कायद्यानें ढवळाढवळ करावयाची नाहीं हें धोरण परक्या सरकारानें ठरवून टाकल्यामुळें किती तरी सुधारणा व्हावयाच्या राहिलेल्या आहेत. त्यामुळें कैक हिंदी स्त्रियांचीं मनें दग्ध व शरीरें भग्न होतात. त्या हालअपेष्टा टळण्यासाठीं सध्यां त्यांना आपल्या पतिच्या सौजन्यावरच अवलंबून रहावें लागतें. पण सध्यांच्या परिस्थितींत तेवढा आधार पुरेसा

होत नाहीं. कायद्यानें त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिति सुधारली पाहिजे."
—Religion in Transition

**विधर्मी धर्मप्रचारक**

"पुष्कळ ख्रिश्चन मिशनरी, स्वतः चांगले धर्मनिष्ठ असून, दुसऱ्यांना पूज्य असणाऱ्या तत्त्वांची कुचेष्टा करीत हें पाहून मला फार खेद होई. असें करण्याला ख्रिस्ताच्या उपदेशांत वा वर्तनांत काय आधार आहे? त्याच्या कांहीं शिष्यांनीं मात्र ही उपहासबुद्धि वाढीस लावली. बायबलच्या बाहेर कांहीं धार्मिक सत्य असेल; तर तें सैतानाचें कृत्य होय असें ऑगस्टाइन् मानी. पण धर्माधर्मांचा तौलनिक अभ्यास करणाऱ्यांना ईश्वराचा आविष्कार सर्वत्र झाल्याचेंच आढळून येतें. "ईश्वराचा साक्षात्कार मलाच काय तो झाला आहे, आम्हीच काय ते त्याचे लाडके लोक आहोंत;" असें मानणें म्हणजे प्रेममय ईश्वराच्या न्यायबुद्धीवर बोळा फिरविण्यासारखेंच आहे. आपला धर्म म्हणजे सर्व धर्मांचा तुरा, धार्मिक विकासाची ती परमसीमा, त्यांत इतर धर्मांनीं विलीन व्हावें असें जो तो म्हणतो. पण ही खुळी कल्पना आहे. आध्यात्मिक मक्तेबाजीला यापुढील जगांत तरी स्थान नाहीं."

(Religion in Transition)

## प्रकरण ६ वें

# हिंदुधर्माचा गंगा-प्रवाह

" The more it changes, the more it remains the same thing "

—राधाकृष्णन्

हिंदुधर्माचें प्रतीक कोणतें ? शुभ्र संगमरवरी दगड घेऊन त्यांतून एक सुरेख मूर्ति निर्माण केली; तर आपण ती हिंदुत्वाची देवता म्हणूं शकूं काय ? मूर्तीची धवलता सूचक व समर्पक आहे; पण त्या मूर्तीप्रमाणें हिंदुधर्म हा स्थिर नाहीं, प्रस्तरवत् नाहीं, विकास खुंटलेला नाहीं.

मग हळुहळु, पाकळ्यापाकळ्यांनीं फुललेलें, मनोहर रंगाचें व मधुर गंधाचें कमलपुष्प हें हिंदुत्वाचें बोधक चित्र म्हणून काढतां येईल काय ? आजवर अनंत मुमुक्षु जीव भुंग्याप्रमाणें त्या कमलावर झेपावत आले, म्हणून तें चित्र यथार्थ वाटेल; पण फूल—मग तें कमल असो वा कण्हेर असो—कालांतरानें सुकावयाचेंच. हिंदुत्वाला तें भय नाहीं.

पूर्वी विकास पावलेला व पुढेंहि विकास पावणारा, भूतकाळांत पांच-दहा हजार वर्षें टिकलेला व भविष्यकाळांत त्याहून अधिक काळ टिकणारा हिंदुधर्म हा विशाल, शीतल व पवित्र अशा गंगा-प्रवाहा-सारखा आहे. फूल सुकतें, झाड वठतें, दीपज्योत विझते; पण

गंगा आहे सदैव वाहती आणि वाढती. गंगेचा जन्म देवतात्मा हिमालयाच्या पोटीं; हिंदुधर्माचा उगमहि तेथलाच. हिमालयाच्या उत्तुंग शिखराचा थांग अजून जसा लागलेला नाहीं; तसेच हिंदु-धर्मांतील वेदांचे कर्ते अज्ञात—अपौरुषेय. गंगेच्या जीवंत वाहत्या प्रवाहाइतकाच हिंदुधर्महि परिवर्तनशील आहे. 'जितका तो बदल पावतो, तितका तो अचल होतो.' गंगा मार्ग कसा काढते? वाटेंत खडक आडवा आल्यास, शक्य तर त्याला वळसा घालून व अवश्य तर तो फोडूनहि, पुढें येईल त्या भूप्रदेशाचे रंग आत्मसात् करून व त्याच्या उंचसखलपणाप्रमाणें आपलें पात्र आंखून गंगानदी सतत व अखंड पुढें आणि पुढेंच, जात असतें.

हिंदु धर्माच्या विकासावस्थेंतहि बौद्ध, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि-कांचे प्रतिरोध कांहीं थोडथोडके आले नाहींत; अंतर्गत विरोधहि पुष्कळ झाले. त्या सर्वांना हिंदुधर्म पुरून उरलेला आहे. स्वत्व कायम ठेवून देशकालवर्तमानाप्रमाणें साधनांचें परिवर्तन करून तो तत्त्वतः सना-तन राहिला आहे. शैव-वैष्णव, सांख्य-नैयायिक, द्वैत-अद्वैत—नाना पंथ सामावून तो समृद्ध झालेला आहे. तीच उदारता गंगेची. तिचा उगम विष्णु-चरणांतून; आणि तिचें वास्तव्य शंकराचे शिरावर. लहानलहान होड्या-मचवे जसे गंगाजलावर विहार करतात; तशींच मोठमोठीं जहाजंहि. हिंदुधर्माचें छत्रहि मूर्तिपूजकापासून ब्रह्मोपासका-पर्यंत व जनाबाईपासून जनकापर्यंत सर्वांवर आहेच.

फरक एकच आहे व तो हा कीं, गंगेचे छोटेमोठे कालवे शेंकडो काढूनसुद्धां वंगभूमीच काय ती 'सुजला–सुफला' झाली—इतरांनीं फक्त सिंचनापुरती गंगा गिंड्या व कावडी भरून

न्यावो ! पण हिंदुधर्मातील तत्त्वज्ञान केवळ बंगाललाच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानला, नव्हे निःशेष जगताला आध्यात्मिक संदेश देत आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा एक मोठा कालवा युरोप व अमेरिका या खंडापर्यंत खोदण्याचें व त्याच्या पाण्यावर तेथें अध्यात्मविचाराचें पीक काढण्याचें कार्य ज्या दोन–चार विभूतींनीं केलें, त्यांत श्री. राधाकृष्णन् यांचें स्थान उच्च आहे.

पाश्चात्य जगाचे कानीं त्यांनीं हिंदुधर्माचीं तत्त्वें घातलीं हें कार्य दिसतें त्याहून अवघड आहे. पाश्चात्य देशांतील कारखान्यांत तयार झालेलीं

**संशोधनपूर्वक प्रचार**

औषधें जशीं बाटल्यांत भरून, मोहोर करून व चिट्ठी चिकटवून हिंदुस्थानांत भराभर पाठविलीं जातात; तशीं भारतीय तत्त्वज्ञानाचीं तत्त्वें खुडून–वेंचून त्यांचीं गांठोडीं जशींच्या तशीं रवाना करणें हें राधाकृष्णन् यांचें कर्तव्य नाहीं. अरण्यांत शिरून, वनस्पति शोधून, त्यांचें शास्त्रीय संशोधन करून त्यांतील इष्ट भागाचेंच नव्या वैज्ञानिक भट्टींत रसायन बनविणें व मग तें पाश्चात्यांपुढें ठेवणें ही दुहेरी कामगिरी त्यांनीं बजावली आहे. वैदिक ऋषींनीं एखादें वचन उद्गारलें असलें तर तें कोणत्या परिस्थितींत, काय हेतूनें असेल, हें जाणण्यासाठीं त्या काळांत प्रवेश करून, त्या ऋषीमुनींशीं समरस होऊन, त्यांच्या विचारांच्या पातळीपर्यंत पोंचून मगच त्या वचनांचा संदर्भ व सुसंगत असा अर्थ राधाकृष्णन् लावतात आणि कण व भुसा, प्रकाश व काजळी, यांचा सारासार विवेक करून ग्राह्यांश तेवढा ते वाचकांपुढें वा श्रोत्यापुढें ठेवतात.

राधाकृष्णन् यांनीं निश्चयानें व आग्रहानें कोणता विचार मांडला असेल, तर तो हा कीं, हिंदुधर्म हा सांचलेला, थांबलेला, स्थिर धर्म नाहीं; तर तो एकसारखा बदलणारा-वाढणारा आहे.

**परिवर्तनशील धर्म**

" कित्येक शतकांच्या हिंवाळ्यांत हिंदुधर्माचीं पर्णपुष्पें गळून पडलीं असलीं, तरी आज आपण पुनः अंकुरणारा हिंदुधर्म पहात आहों-जुन्या धर्माकडे नव्या दृष्टीनें पहात आहों " असा त्यांचा विश्वास आहे. हिंदु धर्माविरुद्ध बंड करून निघालेला बौद्धधर्महि बगलेंत मारून—म्हणजे त्यांतील सत्तत्त्वें ग्रहण करून—हिंदुधर्म जसा अभंग राहिला; तसाच 'धर्म ही अफू आहे' असें म्हणणाऱ्या समाजवाद्यांतीलहि ग्राह्यांश घेऊन हिंदुधर्म जगद्धर्म बनेल असें त्यांना वाटतें. ते स्वच्छ म्हणतात,

There has been no such thing as a uniform, stationary, unalterable Hinduism.

हिंदुधर्म म्हणजे बहुमोल खाजिना सांठविणारी तिजोरी नसून ज्ञानाची पेटती मशाल हातीं घेऊन जगभर उजेड पाडीत जाणारा तो यात्रेकरु आहे असें रूपक त्यांनीं वर्णिलें आहे.

हिंदुधर्माच्या वर्धिष्णुतेप्रमाणेंच त्याच्या आचार—प्राधान्यावरहि राधाकृष्णन् यांचा कटाक्ष आहे. ते परिवर्तनवादी आहेत, कर्मठ नाहींत; तरी ' आचारप्रभवो धमः ' हें तत्त्व त्यांना मान्य आहे.

**आचारावर भर**

त्यांच्या मतें. " केवळ एक विचारपंथ असें हिंदुधर्माचें स्वरूप नाहीं; तर जीवनाचा एक मार्ग म्हणून तो पतकरला पाहिजे. विचाराच्या क्षेत्रांत हिंदुधर्म पूर्ण स्वातंत्र्य देतो, पण त्याबरोबरच

विधिनिषेधात्मक आचाराचें बंधनहि तो घालतो." भूमितिचा एकादा सिद्धांत शिकणें आणि धर्माचें एकादें तत्त्व जाणणें यांत महदंतर आहे. "मी आस्तिक—मी नास्तिक, मी पौरुषेयवादी—मी अपौरुषेयवादी" असें केवळ बुद्धीला पटून तसें लिहिणें—बोलणें यांत हिंदुधर्म सांठविलेला नाहीं; तर त्या त्या मताप्रमाणें प्रत्यक्ष आचार करणें यांत तो आहे. लो. टिळकांनीं 'गीतारहस्यांत' म्हटल्याप्रमाणें,

"हे सिद्धांत बुद्धींत उतरल्यावर, मनांत बिंबून, हृदयांत ठसून आणि हाडामांसांत खिळले जाऊन, एकच परब्रह्म सर्व प्राणिमात्रांत भरलेलें आहे, अशा प्रकारच्या परमेश्वरस्वरूपाची पूर्ण ओळख होण्यास........अनेक पिढीजात संस्कारांची, इंद्रियनिग्रहाची, दीर्घोद्योगाची व ध्यान आणि उपासना यांची जरूर सतत लागत्ये.....हें आचरण ज्या पुरुषांत दिसून येत नाहीं, त्याचें 'मडकें' त्या मानानें कच्चेंच आहे....असें समजावें."

**जीविताचें ध्येय**

सर्वत्र एकच ईशतत्त्व भरलेलें आहे आणि म्हणून आत्मौपम्यबुद्धि धारण करावी अशी नुसती मनाची समजूत पटून काय उपयोग? त्याप्रमाणें आचरण करील तोच खरा धार्मिक. "धर्माचा प्रारंभ व्यक्तीपासून होत असला तरी त्याचें पर्यवसान विश्वबंधुतेंत झालें पाहिजे." असा सिद्धांत मांडून राधाकृष्णन् यांनीं संतसाधूंनींहि जनसेवा केलीं पाहिजे हें कर्मयोगी मत आग्रहानें प्रतिपादिलें आहे. मानवाचा खरा उद्धार समाज पूर्णावस्थेस पोंचल्याशिवाय होतच नाहीं असें ते म्हणतात. स्वतःचेंच

सुख पहात रहाणारा माणूस एक प्रकारच्या तुरुंगांत असतो असें वर्णन मि. एच्. जी. वेल्स यांनीं 'औटलाइन् ऑफ हिस्टरी' या ग्रंथांत केलें आहे व त्या तुरुंगांतून बाहेर पडण्याचा मार्गहि तेथेंच सांगून ठेवला आहे. तो मार्ग म्हणजे व्यक्तिहित हें समष्टिहितांत मिसळणें. 'मी सुखी आहे कां दुःखी?' अशी चिकित्सा करीत बसणारा तोच खरा दुःखी! इतरांचीं दुःखें जाणून, तीं आपलीं मानून, त्यांचें निवारण करण्यास झटणें हाच खरा मानवधर्म. त्यानेंच अंतःकरणाचा विकास होतो व खरें सौख्य तेंच. राधाकृष्णन् आपल्या जीविताचें सार सांगतांना म्हणतात, "बुद्ध-ख्रिस्त अशा धर्मात्म्यापासून सर्वसामान्य धर्मसेवकापर्यंत प्रत्येकानें हाडाचीं काडें केलीं तीं कशासाठीं? तर मानवजातीच्या शिरावरील भार हलका करावा आणि तिच्या लांबच्या प्रवासांत तिला धीर द्यावा म्हणून. आपल्यालाहि त्यांच्याच मार्गानें पावलें टाकावयाचीं असतील; तर आपण दीन-दुर्बलांना साहाय्य व रंजल्या-गांजल्यांना सुख द्यावें. एकाद्या दुःखी प्राण्याचे डोळ्यांतील अश्रु पुसले किंवा एकाद्या बालकाला हसवून आनंद दिला तरी तेंहि धर्मकृत्यच होय."

**"न त्वहं कामये राज्यम् न स्वर्गं नापुनर्भवम् ।**
**कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ॥"**

हें भागवतांतील वचन राधाकृष्णन् ब्रीदवाक्य मानतात. धर्माचा आत्मा सर्वभूतानुकंपा; आणि तिचें सगुण स्वरूप म्हणजे सर्वभूतहितरत असणें हें. केवळ तत्त्वचिंतानुवाद आपल्याला मान्य नाहीं हें राधाकृष्णन् पुढील युक्तिवादानें निवेदन करतात.

प्रेमाचा मंत्र

" धर्म, धर्म म्हणजे काय ? तर न्याय करणें, दया ठेवणें व आपल्या बांधवांना सुख देणें. धार्मिक मनुष्य म्हणजे कांहीं शोभिवंत फळासारखा तावदानी कपाटांत ठेवून देण्याची चीज नव्हे. मानवजातीकरितां झटणारा, मानवामानवांमध्यें प्रेमाचें व सख्याचें नवीन नातें निर्माण करणारा तोच साधु ओळखावा. माणसांमधील केवळ आत्मतत्त्व पाहून मी व्यवहार करतों असें एकाद्या सिद्धानें म्हणून कसें चालेल ? त्याचें प्रेम कशावर ? माणसाच्या नुसत्या आत्म्यावर ? मग टेलिफोनच्या नामावलिच्या चोपड्यावरच तो प्रेम कां करीत नाहीं ? मानवदेहधारी स्त्री-पुरुषांशीं वागण्यांतच संताचें संतत्त्व प्रगट झालें पाहिजे. अशी कथा आहे कीं, एक तात्त्विक संत स्वर्गांत गेला तेव्हां त्याला सुवर्णमुकुट देण्यांत आला. तो संतुष्ट झाला. पण आजूबाजूला पहातो तों रत्नखचित मुकुट धारण करणारे किती तरी संतसज्जन ! 'माझ्या मुकुटावर रत्नें कां नाहींत ?' तात्त्विक संतानें पृच्छा केली. 'तीं रत्नें म्हणजे त्या महात्म्यांच्या नेत्रांतून पृथ्वीवर गळलेले अश्रु होत !' देवांनीं उत्तर दिलें. " पण मी तर भूलोकावर आत्मानंदांत तल्लीन होतों." "म्हणून आपल्याला सोन्याचा मुकुट दिलाच आहे. रत्नें आहेत तीं परदुःखानें दुःखित झालेल्यासाठीं." जनसेवा करणारे महात्मे म्हणजे अंधाऱ्या रानांत चाचपडत चाललेल्या लोकांना आशेचे किरण होत. जगाचें धारण त्यांच्यामुळेंच होतें. धर्माच्या बाजारपेठेंत न्यायापेक्षां दयेचा भाव अधिक. पीडिताकडे प्रेमाचें स्मित, दलिताकडे बंधुभावाची दृष्टि,

दुःखिताच्या पाठीवर फिरलेला स्नेहार्द्र हात,—आयुष्येंच्या आयुष्यें ह्यानें सुधारतात; जाड्या पांडित्यापेक्षां त्याची थोरवी अधिक; धर्माचे पंचप्राणच ते ! ”

समाजापासून फटकून वागणारे पंडित समाजावर प्रेम तरी कसें करणार आणि त्याचें कल्याण तरी कसें साधणार? “ कोणावरहि प्रेम केल्याशिवाय त्याची खरी ओळख होत नसते हें खरें; पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, कोणाची ओळख करून घेतल्याखेरीज त्याचेवर प्रेमहि जडत नसतें. ” असा विरोधाभासात्मक सिद्धांत राधाकृष्णन् यांनीं मांडला आहे. समाजाची समुन्नति व्हावयाची ती सामुदायिक पद्धतीनें एकदम होणें कठीण; प्रत्येक व्यक्तिच सुधारणें हा सावकाशीचा व कष्टाचा मार्गच चिरपरिणामीं आहे असें राधाकृष्णन् यांचें मत आहे. या मताचा वस्तुपाठ म्हणून म. गांधींचें नैतिक राजकारण ते निर्देशितात. वृक्षाच्या बुंध्यापासून शेंड्यापर्यंत आरपार भरलेला जीवन-रस हा जसा फुलाफळावरून अनुमित होतो; तसाच अंतरीं धर्मामृत गेल्याचें गमक म्हणजे धार्मिकाचा आचार.

**भिन्नभिन्न संस्कृतींचें सहकार्य**

वर्धिष्णुता हा जसा हिंदुधर्माचा विशेष गुण आहे; तसेंच आचारप्रधानता हेंहि त्याचें महत्त्वाचें लक्षण आहे. सहिष्णुता हें त्याचें अंगहि अनन्यसामान्य आहे. बौद्ध, ख्रिस्ती, महंमदी इत्यादि एकएका व्यक्तीवर आधारलेले धर्म हे हिंदुधर्माचे पुत्रपौत्र शोभतात. त्या सर्वांचा संग्रह व संभाळ करण्याइतकें उदार व सहिष्णु स्वरूप हिंदुधर्माचें आहे. व्यक्ति तितक्या प्रकृति व प्रकृति तितके

उन्नतिचे मार्ग. सश्रद्ध माणसाला भक्तिमार्ग सुखाचा वाटेल, तर विवेचकाला ज्ञानमार्ग मान्य होईल. त्या सर्वांना एकाच चाकोरातून नेण्याचा एककल्लीपणा हिंदुधर्मांत मुळींच नाहीं; किंबहुना "माझे अनुयायी तेवढेच तरतील; इतर सारे काफिर, त्यांचें तारण होणें अशक्य" ही कोती भावना 'भूतानि यान्ति भूतेज्या' असें म्हणणाऱ्या हिंदुधर्मांत मुळींच नाहीं. सर्व जगांत एकच एक संस्कृति असावी अशा मताचे राधाकृष्णन् मुळींच नाहींत. "कल्की" या आपल्या सूत्रमय ग्रंथांत त्यांनीं संस्कृतिचें लक्षण "विशिष्ट जनसमूहाच्या जीवनशक्तींचें आविष्करण" असें सांगितलें आहे. जगांतील सर्व संस्कृति एकछापी, एकसांची न रहातां ठिकठिकाणच्या जनसमूहाला अनुरूप अशा असतील, पण त्या नानात्त्वांतहि एकत्त्व आढळलें पाहिजे अशी त्यांची विचारसरणी आहे. त्यांच्यांत सहकारिता असावी, एकरूपता नव्हे असें ते म्हणतात.

पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देश डोंगर-नद्या वगैरे बाबतींत समान नसतात, हवामानाप्रमाणें तेथील वेष-आहार बदलतात; पण देशाभिमानाची भावना सर्वत्र एक असूं शकते; ती दुसऱ्याच्या देशाला मारक होऊन जागतिक शांततेला विघ्न न ठरली म्हणजे झालें; हाच दाखला धर्माचे बाबतींत लागू पडण्यासारखा आहे. आपापला धर्म सुरक्षित ठेवून, पण तसें करतांना परधर्माची सुरक्षितता नष्ट न करून, सर्व धर्म सहिष्णुतेनें वागतील; तरच जगांत खरें ऐक्य व शाश्वत शांति नांदेल. वहातुकीच्या साधनांनीं जग जवळ आलें आहे, आर्थिक बंधनांनीं तें एक झालें आहे; त्याबरोबरच वैचारिक ऐक्यभावहि जगांत पसरला पाहिजे; आणि

तें करण्याचें कार्य धर्माचें आहे. तें सध्या होत नसल्यानें भय व हिंसा यांच्या दाढेंत सारें जग सांपडलें आहे. "आपण खातों त्या अन्नांत विष असेल काय? आपण हुंगतों त्या हवेंत विषारी वायु सोड-लेला आहे काय? आपण चालतों त्या जमिनीखालीं सुरुंग पेरलेले आहेत काय? डोक्यावर बॉंब पडतो कीं काय?" असें भय आपल्या पाठीस सदैव लागलें आहे. या भयापासून मानवजातीला मुक्त कर-ण्यास फक्त धर्मच समर्थ आहे. मानवाची मनःक्रांति करून जगावर अभय व अहिंसा यांचीं छत्रचामरें उभारण्याचें कार्य धर्माचें आहे. तें न करतां तो जनतेचें भय व हिंसा, पारतंत्र्य व द्वेष कायम ठेवील; तर मार्क्सनें म्हटल्याप्रमाणें, धर्म हा अफू ठरेल, हृदयशून्य समाजाचें हृदय बनेल.

धर्मावर अधिष्ठित असलेले समाजच दीर्घायुषी ठरले आहेत असें राधाकृष्णन् यांनीं दाखवून दिलें आहे.

अंतःस्फूर्तीनेंच साक्षात्कार अर्थप्रधान संस्कृति चिरकाल टिकणें कठीण आहे. मानवामानवामध्यें बंधुभावाची वाढ झाल्याशिवाय समाजाला शाश्वती येईल कशी? आणि हा बंधुभाव निर्माण करण्यास 'सर्वां भूतीं एक आत्मा' हें तत्त्वच समर्थ आहे. सर्व जग हें एकाच ईशतत्त्वानें स्फुरत आहे याचें ज्ञान केवळ बुद्धीनें होऊं शकेल, किंबहुना भौतिक शास्त्रांची जसजशी प्रगति होत आहे, तसतसें त्या शास्त्रांचें प्रतिपादन विश्वात्म्यैकाला अनु-कूल असेंच होऊं लागलें आहे हा आधार देऊन राधाकृष्णन् म्हण-तात, ईश्वराचें सत्यत्त्व पटतें मात्र अंतःस्फूर्तीसच. ( An intellectual search for the ultimate cause may lead to an

idea of God; Intution tells us that the idea is not merely an idea but a fact.) या सत्य ईशतत्त्वाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं माणसानें अहंकाराचा, मी-पणाचा, स्वतः-वरील आसक्तीचा त्याग केला पाहिजे. 'वासुदेवः सर्वमिति' ही भावना मानवानें बुद्धींत सांठविणें व वर्तनांत वठविणें हेंच त्याचें ध्येय.

राधाकृष्णन् हे पक्के ईश्वरवादी आहेत. ते म्हणतात, "आपल्याला जी आनुवंशिक गुणसंपदा लाभली असेल, ज्या मानसिक व शारीरिक शक्ति मिळाल्या असतील; त्यांचा विनियोग जास्तींत जास्त व उत्तमांतील उत्तम कार्याकडे करण्याचें स्वातंत्र्य मनुष्याला आहे. त्यानें आपल्या वर्तनाला असें वळण लावलें पाहिजे कीं, त्याचें फल आध्यात्मिक साक्षात्कार हें असावें. त्या साक्षात्काराचा आनंद हा अलौकिक आहे, अनन्यसामान्य आहे. त्या दिव्य आनंदापुढें आपलीं पार्थिव सुखें म्हणजे उगवत्या सूर्य-नारायणापुढें विजेचे दिवे."

**जागतिक तत्त्वज्ञानाचें मंदिर**

भाग्य भारतवासियांचें कीं, या आत्मानंदाचा शोध इतर कोणत्याहि देशापेक्षां अधिक काळ व अधिक सूक्ष्मतेनें येथें घेतला गेला. दृश्य सृष्टीच्या पलीकडे "कांहीं तरी एक व अमृत तत्त्व आहे, या लोण्याच्या गोळ्यावर ऋग्वेदांतील ऋषींच्या बुद्धीची पहिल्याच झपाट्यास अचूक उडी पडली!" सहस्रानु-सहस्र वर्षें भारतवर्षानें जोपासलेल्या अध्यात्मविद्येच्या आधारावर नवीन दृष्टिकोणानें हिंदुधर्म जागतिक तत्त्वज्ञानाचें मंदिर बांधील

अशी आशा राधाकृष्णन् यांनीं व्यक्त केली आहे. आमची प्राचीन संस्कृति आदर्शवत् होती म्हणून तिचे पोवाडे गाणें आणि अर्वाचीन सुधारणा जडवादी आहे म्हणून तिला तुच्छ लेखणें ही सर्वसाधारण हिंदुप्रवृत्ती राधाकृष्णन् प्रगतिची मानीत नसून प्रतिक्रियेची समजतात. आपणावर जुलूम करणाऱ्या जातिभेदासारख्या जीर्ण चालीरीतींचा नायनाट आपण केला पाहिजे अशी चेतवणी देतांना ते म्हणतात, " आपण आपल्या दैनंदिन व्यवहारांत अशा किती तरी गोष्टी करतों कीं, ज्या आपल्या मनुष्यपणाला बट्टा लावणाऱ्या ठरतील. आपण अन्न खातों, कपडे पेहरतों आणि नानासुखें भोगतों; पण तीं सुखें जे कोणी निर्माण करतात ते पळापळाला मृत्युला जवळ करीत आहेत. " मानवतेला लांच्छनास्पद असें हें आचरण त्याज्य मानून, प्राचीन परंपरा न सोडतां व नवीन दृष्टि न टाकतां, ज्ञानानें भय आणि प्रेमानें हिंसा नष्ट करून, आत्मचिंतन करण्यास व त्याबरोबरच जनसेवेचा कर्मयोग आचरण्यास, हिंदुमात्रानें पुढें यावें आणि युयुत्सु व मुमुर्षु जगताला तारावें असा उत्स्फूर्त संदेश देतांना राधाकृष्णन् म्हणतात,

" If we are to preserve ourselves we must use the lighted torch "

राधाकृष्णन् यांच्या

# प्रमुख ग्रंथांचा परिचय

## The Heart of Hindustan

मद्रासच्या नटेसन आणि कंपनीनें १९३१ मध्यें हें पुस्तक प्रसिद्ध केलें. याचें वैशिष्ट्य हें कीं, अन्यत्र अनुपलब्ध असलेलें राधाकृष्णन् यांचें चरित्र पहिल्या अठरा पृष्ठांत देऊन त्यांच्या ग्रंथ–संपत्तिचें दिग्दर्शन पुढील तिस पानांत केलें आहे. त्यानंतर राधाकृष्णन् यांचे सहा लेख संग्रहीत केले आहेत. त्यांत हिंदु धर्माची विशालता व सहिष्णुता वर्णन करून चातुर्वर्ण्य व चतुराश्रम यांचें रहस्य उकलून दाखविलें आहे आणि इस्लाम, ख्रिस्ती व बौद्ध या धर्मांशीं असलेलें साम्य-वैषम्य विशद केलें आहे. त्या त्या धर्मांतील तत्त्वज्ञान व अनुयायांचें वर्तन यांतील अंतर त्यांनीं मार्मिकपणें उजेडांत आणलें आहे.

★

## The Hindu View of Life

राधाकृष्णन् यांनीं इंग्लंडमध्यें १९२६ त जीं 'अप्टन् व्याख्यानें' दिलीं, तीं या ग्रंथांत समाविष्ट केलेलीं आहेत. पुनरावृत्ति व भाषांतरें यांचा बहुमान या ग्रंथाला लाभलेला आहे. हिंदु धर्माचें अनुभूतिप्राधान्य, सर्वसंग्राहकत्त्व व परिवर्तनशीलता यांचें वर्णन करून ग्रंथकारानें हिंदुधर्मांतील मायावाद व कर्मविपाकवाद यांवरील आक्षेपांचें खंडन केलें आहे आणि जातिव्यवस्थेची इष्टानिष्टता विवेचिली आहे. पाश्चात्य शास्त्रांच्या संघर्षांतून निर्माण होणारा नवा हिंदुधर्म कसा दिसतो हें या पुस्तकांत पहावयास सांपडतें.

★

## Kalki or The Future of Civilization

खिशांत मावण्याजोगा हा सार–ग्रंथ १९२९ सालीं प्रसिद्ध झाला. अवघ्या छोट्याशा नव्वद पृष्ठांत राधाकृष्णन् यांचें सर्व तत्त्वज्ञान मांडणारा हा सूत्ररूप ग्रंथ आंगठीवरील हिऱ्याप्रमाणें चिमुकला पण चमकदार आहे. शास्त्रीय शोधामुळें जगांत ऐक्यभाव निर्माण झाल्याचा भास होत असला तरी अंतःस्थिति कांहीं निराळीच आहे. पूर्वीचीं श्रद्धेयें व मूल्यें ढासळत असून त्याजागीं नवीं ध्येयें व नवीं श्रेयें आलेलीं नाहींत, कुटुंबव्यवस्था विस्कळीत झालेली आहे, यंत्रयुगानें व्यक्ति–जीवन लोपत आहे, आर्थिक विषमता दुःख वाढवीत आहे, राजकारणांत लोकशाहीला यावें तें यश येत नाहीं, आंतरराष्ट्रीय राजकारण तर महायुद्धाकडे मोर्चा करून चाललें आहे—अशा अवस्थेंतील मानव–समाजाला स्थैर्य मिळवून देण्यास धर्मच कसा उपयोगी पडतो व शरीरापेक्षां आत्म्याच्या सुखाकडे लक्ष देण्यास तो कसें शिकवितो, प्रत्येक मतदाराचा प्रामाणिकपणा वाढल्यानें लोकशाही यशस्वी कशी होईल, युद्धाचा संभव केव्हां टळेल व सर्व जगांत बंधुभाव कसा निर्माण होईल या सर्व जीवंत प्रश्नांचा उलगडा या पुस्तिकेंत केलेला आहे.

★

## An Idealist View of Life

१९२९ सालीं इंग्लंडमध्यें राधाकृष्णन् यांनीं जी ' हिबर्ट व्याख्यानमाला ' गुंफली, ती या ग्रंथमंजूषेंत ठेवलेली आहे. इंद्रियजन्य ज्ञान व बुद्धिगम्य ज्ञान यापलिकडे अंतःस्फूर्तीस होणारें जें आत्मज्ञान त्याचें स्वरूप या पुस्तकांत वर्णिलें आहे. नीति, कला व तत्त्वज्ञान यांत प्रतीत होणारें ज्ञान हें भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाहून कसें भिन्न असतें व त्यांत ज्ञाता व ज्ञेय यांचें सामरस्य कसें होतें याचें विवेचन यांत केलेलें आहे.

★

Indian Philosophy.

भाषेच्या अनुपम सौंदर्यानें परिपूर्ण असलेला हा पंधराशें पृष्ठांचा ग्रंथ त्यांतील विचार–प्रगल्भतेच्या दृष्टीनेंहि अत्यंत महत्वाचा आहे. त्याचे दोन खंड आहेत.

**प्रथम खंड**—या खंडाच्या प्रस्तावनेंत भारतीय तत्वज्ञानाचें वैशिष्टय प्रथम सांगून नंतर अध्यात्मवादाला भारतीय तत्त्वज्ञानांत श्रेष्ठ स्थान कां मिळालें याची चर्चा केली आहे. धर्म आणि समाजजिवन यांच्याशीं तत्त्वज्ञानाचे अगदीं निकट संबंध असल्यामुळें भारतीय समाजजीवनाचा विचार करीत असतां तत्त्वज्ञानाचा विचार करणें अपरिहार्य आहे असें मत व्यक्त करून नंतर निरानिराळ्या तत्त्वप्रणालींचा परामर्श घेण्यांत आला आहे. Monistic Idealism व त्याचे प्रकार वार्णिल्यावर भारतीय तत्त्वज्ञानांत एकसूत्रता कशी दिसून येते याचें विवेचन केलें आहे. प्रथम खंडाच्या पहिल्या भागांत वैदिक काळाचा विचार केला आहे. यांत प्रामुख्यानें ऋग्वेदांतील तत्त्वप्रणालींचीच चर्चा आहे. पृथ्वी, वरुण, ऋत, सूर्य, उषस, सोम, यम, इंद्र, इत्यादि वैदिक देवतांच्या स्वरूपाची नंतर चर्चा केली आहे. ऋग्वेदांतील विचारप्रणालींची चर्चा केल्यानंतर यजुर्वेद आणि अथर्ववेद यांतलि विचारांचा परामर्श घेऊन बराचसा भाग उपनिषदांच्या सिद्धान्तांचें सविस्तर समालोचन करण्यांत खर्च केला आहे. ब्रह्मन् आणि आत्मन्, तत्त्वमसी, ब्रह्म आणि जगत् यांचे संबंध इत्यादि गोष्टींची विस्तृत चर्चा केलेली आहे. दुसऱ्या भागांत पौराणिक कालांतील तत्त्वज्ञानाची चर्चा आली आहे. खिस्तपूर्व ६०० ते खिस्तपूर्व २०० या काळांत उद्भुत झालेल्या प्रणालींचा विचार चालू असतांना चार्वाकाच्या जडवादाला प्रामुख्य देणें आवश्यक आहे. लोकायतिकांच्या सिद्धान्ताची विस्तृत चर्चा करून नंतर जैन व बौद्ध तत्त्वज्ञानाची प्रदीर्घ चर्चा करण्यांत आलेली आहे. आठव्या प्रकरणांत महाभारत–रामायण या महाकाव्यांत समाविष्ट झालेल्या तत्त्वज्ञानाचा परा-

मर्श घेतला असून नंतर वैष्णवपंथ, पांचरात्र धर्म, सांख्य मताचा महाभारतांत झालेला आविष्कार, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, इत्यादि गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे. दहाव्या प्रकरणांत भगवद्‌गीतेचा सविस्तर बिचार केला आहे. अकरा आणि बारा या शेवटच्या दोन प्रकरणांत बौद्धांच्या हीनयान आणि महायान या पंथांच्या मतांची चर्चा केली असून नंतर वैभाषिक, सौत्रान्तिक, योगाचार, माध्यमिक या सिद्धांतांची माहिती दिलेली आहे. या चर्चेत विज्ञानवाद, आलयाविज्ञान, निर्वाण, शून्यवाद इत्यादि बौद्ध तत्त्वज्ञानांतील प्रसिद्ध प्रणालींचें समालोचन करण्यांत आलें आहे.

द्वितीय खंड—दुसऱ्या खंडांत न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा आणि वेदान्त या षड्दर्शनांचा विचार करण्यांत आलेला आहे. प्रस्तावनेंत दर्शनें निर्माण होण्याचीं कारणें प्रथम सांगितल्यावर दर्शनांचे वेदांशीं असलेले संबंध स्पष्ट केले आहेत. सूत्रवाङ्मयाची यानंतर माहिती दिली आहे. सर्व दर्शनांना समान असलेल्या विचारांचा परामर्श घेतल्यानंतर प्रथम न्यायशास्त्राचें विवेचन केलें आहे. न्याय आणि वैशेषिक यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करून न्यायशास्त्र कसें आणि केव्हां निर्माण झालें याचें विवेचन केलें आहे. नंतर न्यायशास्त्रांत अंतर्भूत झालेल्या विषयांचा परामर्श घेण्यांत आला आहे. व्याख्या, प्रत्यक्ष, प्रत्यक्षाचे प्रकार, अनुमान, पंचावयवी वाक्य, तर्क, कार्यकारणभाव, कारणांची अनेकता, असत्कार्यवाद, उपमान, शब्दप्रामाण्य, ऐतिह्य, अर्थापत्ति, संभव, अभाव इत्यादि अनेक विषयांची चर्चा करून मग ख्यातींचें (Error) विवेचन केलें आहे. न्यायदर्शनाचे नीतिविषयक विचार, ईश्वराच्या अस्तित्वाविषयींचीं प्रमाणें यासारखे प्रश्न स्पष्ट करून नंतर तिसऱ्या प्रकरणांत वैशेषिक दर्शनाचा विचार केला आहे. ज्ञान कसें प्राप्त होतें याविषयीं वैशेषिक मत सांगितल्यावर मग वैशेषिकांच्या पदार्थांची (Categories) चर्चा केली आहे. 'द्रव्य' (Substance) या पदार्थाचें विवेचन केल्यावर वैशेषिकांच्या

प्रसिद्ध अणुवादाचा ( Atomic Theory ) विस्तृत विचार केला आहे. यापुढें गुण ( Quality ), कर्म, सामान्य ( Generality ) विशेष, अभाव या पदार्थांची चर्चा करून वैशेषिकांच्या नीतिविषयक कल्पनांचें प्रतिपादन केलें आहे.

चवथ्या प्रकरणांत सांख्यमताचें विवेचन आहे. सांख्यांचा सत्कार्यवाद, प्रकृति, पुरुष, त्रैगुण्य, जगदुत्क्रान्ति ( Cosmic evolution ), पुरुष–प्रकृतिसंबंध, ज्ञान कसें प्राप्त होतें यांविषयीं सांख्यमत वगैरे विषयांची चर्चा केल्यावर सांख्यमत नास्तिकवादी आहे कीं काय याचें विवेचन केलें आहे.

पांचव्या प्रकरणांत पंतजलिप्रणीत योगशास्त्राची चर्चा आहे. सांख्य आणि योग यांचे अन्योन्यसंबंध विशद केल्यानंतर योगशास्त्रांतलि महत्त्वाच्या गोष्टींची माहिती देऊन त्यांचें विवेचन केलें आहे. चित्तवृत्तिनिरोधासाठीं आवश्यक असलेल्या प्राणायाम, इंद्रियदमन, समाधि, ध्यान या मार्गांविषयीं योगशास्त्रांचें सिद्धान्त कोणते आहेत याचें नंतर विवेचन केलें आहे.

सहाव्या प्रकरणांत जैमिनीच्या पूर्वमीमांसेचें विवेचन आलें आहे. मीमांसकांच्या ज्ञानप्रक्रियेचें प्रतिपादन करून मग त्यांना मान्य असलेल्या प्रमाणांची चर्चा करण्यांत आली आहे. प्रत्यक्ष, अनुमान, शब्दप्रामाण्य, उपमान, अर्थापत्ति, अनुपलब्धि इत्यादि प्रमाणांची चर्चा करून नंतर प्रभाकराच्या ज्ञानप्रक्रियेचें विवेचन केलें आहे. यापुढेंच कुमारिलाची ज्ञानप्रक्रिया वर्णिली आहे. आत्मन्, मोक्ष, अपूर्व या विषयांची विस्तृत चर्चा झाल्यावर मीमांसकांच्या ईश्वरवादाची माहिती दिली आहे.

सातव्या प्रकरणांत बादरायणाच्या वेदांतसूत्राविषयींची माहिती आली आहे. या सूत्रांचा काळ कोणता तें ठरविल्यावर त्यांचें इतर दर्शनाशीं कोणते संबंध आहेत तें स्पष्ट केलें आहे. आठव्या प्रकरणांत शंकराचार्यांच्या वेदान्ताचा प्रदीर्घ ऊहापोह करण्यांत आला आहे. ४४४ ते ६५८ हीं २१४ पृष्ठें यांसाठीं खर्च केलीं आहेत. एवढा विस्तृत परामर्श

घेण्याचें कारण असें कीं, इतर सर्व दर्शनापेक्षां वेदान्तदर्शन हें ग्रंथकर्त्याला अधिक अभिमत असून शंकराचार्यांच्या मतांविषयीं त्याला फार आस्था वाटते हें होय. प्रथम गौड पादाचार्यांनीं माण्डूक्योपनिषदांवर लिहिलेल्या कारिकांचा परामर्श घेतला आहे; बौद्ध मताचा या कारिकांवर झालेला परिणाम आणि त्यांचें बौद्धमताशीं असलेलें नातें याचें विवेचन केल्यावर भर्तृहरि, भर्तृप्रपंच इत्यादि वेदांतमतांच्या पुरस्कर्त्यांविषयीं थोडी माहिती दिली आहे. यानंतर शांकरवेदांताचें विस्तृत विवेचन आहे.

नवव्या प्रकरणांत रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैतमताची चर्चा केली आहे; आणि दहाव्या प्रकरणांत शैव, शाक्त आणि वैष्णव पंथांच्या तत्त्वज्ञानाची माहिती दिली आहे. नंतर निंबार्क, वल्लभ या तत्त्वज्ञांच्या मतांची चर्चा करून चैतन्याच्या भक्तिसंप्रदायाचें विवेचन केलें आहे.

उपसंहारांत तत्त्वज्ञानांतील भिन्न मतप्रणालींमध्यें एकवाक्यता कशी असते हें सांगून तत्त्वज्ञान व जीवन यांचे अन्योन्यसंबंध कसे असतात याची चर्चा केली आहे.

★

## The Reign of Religion in Contemporary Philosophy

१९२० सालीं हें पुस्तक इंग्लंडांत प्रकाशित झालें व त्यानें आपल्या जनकाला प्रकाशांत आणलें. ऑक्सफर्ड–केंब्रिज वगैरे विद्यापीठांनीं तत्त्वज्ञानाच्या आपल्या अभ्यासक्रमांत हें पुस्तक अंतर्भूत केलें आहे. प्रचलित धर्म–कल्पनांचा तत्त्वज्ञानावर कसा पगडा बसला हें पौरस्त्य व पाश्चात्य उदाहरणांवरून दर्शवून राधाकृष्णन् यांनीं उपनिषदांतील केवलाद्वैतवाद (Absolute Idealism) सिद्ध केला आहे. बर्गसां, हेगेल प्रभृति पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचें खंडन यांत मोठ्या बुद्धिचापल्यानें केलेलें आहे.

ग्रा. ६२८९

★